cmyk

## संपादकीय

### मीठ, साखरेत प्लास्टिक?

सर्वच स्वयंपाकघरांत मीठ, साखर हे पदार्थ असतातच. मीठ आणि साखरेशिवाय जेवणाला चवच येत नाही. मिठाचा वापर जेवणाची चव वाढवण्यासाठी केला जातो तर साखरेचा वापर गोड पदार्थ, चहा-कॉफी बनवण्यासाठी केला जातो. दैनंदिन जीवनात वापरल्या जाणा-या पदार्थांमध्ये मीठ-साखरेचा वापर केला जातो पण आता मीठ आणि साखर खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. कारण नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून या पदार्थांमध्ये मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत म्हणे!

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

### आता या महिलांना मिळणार १२ हजार

नवी दिल्ली-महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. ही योजना महायुतीसाठी विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरु शकते, असा विश्वास महायुती सरकारला आहे. महाराष्ट्र सरकारनंतर आता झारखंड सरकारने महिलांसाठी नवी योजना सुरु केली आहे. या योजनेचं नाव मुख्यमत्री मैय्या सन्मान योजना असे ठेवण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत झारखंड राज्यातील महिलांना वार्षिक १२ हजार रुपये दिले जाणार आहेत. दर महिन्याच्या १५ तारखेला या योजनेचे पैसे महिलांच्या खात्यात जमा होणार आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-११९ | मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# ऐतिहासिक कृषी महोत्सवाची उत्कंठा शिगेला!

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान येणार; शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडेंचे आवाहन

**परळी । प्रतिनिधी**

**येत्या २१ ऑगस्ट (बुधवार) पासून २५ ऑगस्ट पर्यंत असे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक कृषी महोत्सवाची राज्यातील शेतकऱ्यांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे. परळी व बीड जिल्ह्याच्या इतिहासात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होतो आहे. या महोत्सवाचे बुधवारी (ता.२१) दुपारी १ वाजता दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. यावेळी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांची खास उपस्थिती लाभणार आहे.**

परळी वैद्यनाथ नगरीमध्ये प्रथमच होत



असलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याचबरोबर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मंत्री अब्दुल सत्तार, मंत्री तानाजी सावंत, मंत्री अतुल सावे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष खा. सुनील तटकरे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह राज्यातील व बीड जिल्ह्यातील मान्यवर आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभागाने जय्यत तयारी केली असून भव्य वॉटरप्रूफ सभामंडप, चर्चा सत्र व अन्य कार्यक्रमांसाठी आणखी मंडप, आसन व्यवस्था,

पान २ वर

### महोत्सवात भरगच्च कार्यक्रम, माहिती

*या कृषी महोत्सवाच्या माध्यमातून पाच दिवसीय भव्य असे कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, धान्य महोत्सवच, चर्चासत्रे व संवाद, विविध आधुनिक अवजारांची प्रात्यक्षिके, रानभाज्या महोत्सव, यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान व त्यांच्या यशोगाथा, त्याचबरोबर महिला बचत गटांनी बनवलेल्या विविध उत्पादनांची विक्री, शेतीतील वेगवेगळ्या उत्पादनांची उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, यांसह शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या असंख्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती यांची दालने, भाजीपाला महोत्सव, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उत्पादित केलेल्या पदार्थांची थेट विक्री, कृषी विद्यापीठांमधील नवनवीन संशोधनाची प्रात्यक्षिके यांसारखे अनेक उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना अनुभवायला मिळणार आहेत.*

### परळी शहरातील मार्गात बदल

कृषी महोत्सवामुळे परळी शहरात गर्दी असणार असल्याने पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी वाहतूक मार्गात बदल केले आहेत. यात आंबाजोगाई-परळी -गंगाखेड या मार्गाऐवजी आंबाजोगाई-कन्हेरवाडी बायपासमार्गे गंगाखेड, तर गंगाखेड-परळी - आंबाजोगाई मार्गावरील वाहतूक गंगाखेड-ईटके कॉर्नर परळी-टोकवाडी बायपास मार्गे आंबाजोगाई अशी वाहतूक असणार आहे. वाहतूक मार्गातील बदल हा दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते रात्री १० वार्जपर्यंत राहणार आहे.

### सभामंडपास स्व.पंडितअण्णा मुंडे यांचे नाव



दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपामध्ये या कृषी महोत्सवाचे उद्घाटन संपन्न होणार असून, कृषी प्रदर्शनाच्या भव्य सभामंडपास शेतकरी नेते स्व.पंडित अण्णा मुंडे यांचे नाव देण्यात आले आहे. उद्घाटन समारंभाच्या अगोदर छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य रॅलीद्वारे मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे.

## थोडक्यात..

### एमआयएमच्या कार्यालयात राडा

मुंबई- नागपाडा परिसरातील एमआयआमच्या कार्यालयात जोरदार राडा झाला. एमआयएमचे मुंबई अध्यक्ष फैयाज अहमद यांना पदावरून हटवल्यानंतर हा राडा झाला. फैयाजच्या समर्थकांनी पत्रकार परिषदेत गोंधळ घातला. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्याकडून पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

### आ.झिशान सिद्दिकी काँग्रेस सोडणार

मुंबई-काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दिकी अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेची झिशान सिद्दिकी यांच्याकडून जय्यत तयारी सुरु आहे. वांद्रे पूर्व या मतदारसंघांमध्ये ठिकठिकाणी पवारांच्या यात्रेचे बॅनर्स झळकले आहेत. बाबा सिद्दिकी यांनी मागच्यावर्षी अजित पवार गटामध्ये पक्षप्रवेश केला होता.

### भाजपच्या सहा जिल्हाध्यक्षांची गच्छंती

मुंबई-लोकसभेतील पराभवानंतर भाजपची मोठी कारवाई केली आहे. विधानसभेत डॅमेज कंट्रोलसाठी भाजपने कारभारी बदलले आहेत. मुंबई भाजपात मोठे संघटनात्मक फेरबदल करण्यात आले आहेत. मुंबईतील सर्व ६ जिल्हाध्यक्षांची पदावरून गच्छंती करण्यात आली आहे तर काही मंडल अध्यक्षांवरही कारवाईची शक्यता आहे.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | | |
| २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | | |
| २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | | |
| ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | | |
| ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | | |
| २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | | |
| ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | | |
| ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# ..तर मी राजीनामा देईन अन् निवृत्त होईन

## देवेंद्र फडणवीसांचे मोठे विधान; मराठा आरक्षणावरुन घेतली भुमिका

**मुंबई । प्रतिनिधी**

**मी आरक्षणात अडथळा आणला असे जर एकनाथ शिंदे म्हणाले, तर मी त्याचवेळी राजीनामा देईन, असे देवेंद्र फडणवीस यांनी रोखठोक भुमिका घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आरक्षण देऊ इच्छित आहेत. मात्र, देवेंद्र फडणवीस त्यांना थांबवत आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला. त्यांच्या या आरोपावर आता देवेंद्र फडणवीसांनी हे मोठे विधान केले आहे.**





गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला आहे. अनेक मराठा आंदोलनकर्ते मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरले आहेत. त्यातच मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांच्याकडून केली जात आहे. आता मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मैदानात उतरलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर मोठा आरोप केले आहे. एकनाथ शिंदेंना आरक्षण द्यायचे आहे, पण देवेंद्र फडणवीस हे आरक्षण देण्यासाठी थांबवत आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला. आता यावर देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले आहे. देवेंद्र फडणवीसांनी नुकतेच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले

पान २ वर

### मनोज जरांगेंचे आरोप खोटे-एकनाथ शिंदे

आता, फडणवीसांच्या प्रतिक्रियेनंतर पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना, एकनाथ शिंदे यांनी हे सर्व आरोप फेटाळले आहेत. तसेच, मराठा आरक्षणाच्या प्रक्रियेत देवेंद्र फडणवीसांची मोलाची भूमिका असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

### डॉ.काळगे यांची खासदारकी धोक्यात

लातूर: जात वैधता प्रमाणपत्रासाठी देण्यात आलेल्या कागदपत्रांची २ सप्टेंबर २०२४ पर्यंत पूर्तता करा अशा सूचना हायकोर्टाने लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना दिल्या आहेत. त्यामुळे डॉ. शिवाजी काळगे यांची खासदारकी धोक्यात येणार असल्याचे संकेत आहेत. नरसिंगराव उदगीरकर यांच्या याचिकेवर मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने डॉ. शिवाजी काळगे यांना याबाबत नोटीस बजावली आहे.

## रक्षाबंधन: बहिण-भावाच्या नात्याचा गोडवा जपला

### धनंजय मुंडे, महादेव जानकर यांना पंकजा मुंडे यांनी बांधली राखी

**बीड । प्रतिनिधी**

**भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी रक्षाबंधनानिमित्त कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना आणि रासपचे नेते महादेव जानकर यांना राखी बांधली. तसेच माजी खा. प्रितमताई मुंडे, यशश्री मुंडे, मंत्री अदिती तटकरे यांनीही धनंजय मुंडे यांना राखी बांधली. यावेळी धनंजय मुंडे यांनी आपल्या लाडक्या बहिणींना विशेष भेटवस्तू दिल्या.**



पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यातील राजकीय संघर्ष संपला आहे. पंकजा मुंडे यांच्या निवासस्थानी धनंजय मुंडे यांनी हजेरी लावत राखी बांधून घेतली. माजी खासदार प्रीतम मुंडे आणि यशश्री मुंडे यांनी देखील धनंजय मुंडे यांना राखी बांधली. महादेव जानकर यांनी पंकजा मुंडे यांना बहीण मानले असून ते दरवर्षी रक्षाबंधनाला उपस्थित असतात. गेल्या १३ वर्षांपासून पंकजा मुंडे या महादेव जानकर यांना राखी बांधतात. प्रीतम मुंडे आणि यशश्री मुंडे यांनी महादेव जानकर यांना राखी बांधली. महादेव जानकर यांनी १३ वर्षांपूर्वी

पान २ वर

## लाडक्या बहिणीमुळे महाराष्ट्रात लवकरच राष्ट्रपती राजवट?

### महायुतीचा मास्टर प्लॅन आला समोर; महाविकास आघाडीसमोर पेच



**मुंबई । प्रतिनिधी**

दिवाळीनंतर महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक घेण्याचे संकेत निवडणूक आयोगाने दिले असले तरी राज्यामध्ये विद्यमान विधानसभेची मुदत संपल्यानंतरच म्हणजेच डिसेंबरच्या पहिल्या अथवा दुसऱ्या आठवड्यात निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे. तसेच ही निवडणूक लांबणीवर पडण्यामागे शिंदे सरकारच्या लाडकी बहीण योजना कनेक्शनचीही चर्चा आहे. विशेष म्हणजे डिसेंबरमध्ये निवडणूक झाल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचीही

पान २ वर

### ...म्हणून डिसेंबर अटळच

महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाचे टप्पे ऑक्टोबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यामध्ये जाहीर केले जातील अशी शक्यता आहे. त्यानंतर ४५ दिवसांचा कालावधी प्रचारासाठी दिला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणूक वर्षाअखेरीस म्हणजेच डिसेंबरमध्ये घेण्याशिवाय इतर कोणताही पर्याय आयोगाकडे सध्या तरी उपलब्ध नसल्याचे उघड आहे. पर्याय नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## संभाजी भिडे काही बोलण्याच्या लायकीचे आहेत का?-पवार

**पुणे । प्रतिनिधी**



**संभाजी भिडे यांनी केलेल्या वक्तव्यावर पत्रकारांनी शरद पवारांना प्रश्न विचारला. त्यावर शरद पवार भडकले. संभाजी भिडे हे काही बोलण्याच्या लायकीचे व्यक्ती आहेत का असा प्रतिसवाल त्यांनी केला. त्यामुळे शरद पवार हे भिडे यांच्यावर आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले.**

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा तापला असताना त्यावरून आता वेगवेगळ्या प्रतिक्रिया येताना दिसत आहेत. मराठ्यांना कशाला हवंय आरक्षण

पान २ वर

## अतिवृष्टीमुळे पाटोदा तालुक्यातील पिकांचे सरसकट पंचनामे करावेत-सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यात गेल्या तीन ते चार दिवसांपासून संपूर्ण तालुक्यातील महसूल मंडळात अचानक पर्जन्याने आपले रौद्ररूप दाखवत शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले. अस्मानी संकटाशी सामना करावा लागत आहे. परिस्थितीमुळे झालेल्या पिकांचे व नुकसानीचे तातडीने पंचनामे

पान २ वर



## राज्यातील ६ तहसीलदारांच्या बदल्या

### माजलगावला संतोष रुईकर यांचे नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाने आदेश काढून राज्यातील ६ तहसीलदारांच्या बदल्या केल्या असून बीड जिल्ह्यातील माजलगाव तहसीलदार संतोष रुईकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बदल्या निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार करण्यात आल्याचे शासनाचे सहसचिव अजित देशमुख यांनी आदेशात म्हटले आहे. महाराष्ट्रातील सहा तहसीलदारांच्या बदल्या शासनाने दिनांक १९ ऑगस्ट रोजी आदेश काढून केलेल्या आहेत. महसूल विभागाच्या या आदेशानुसार श्रीमती कोमल ठाकूर यांची रायगड जिल्हा कार्यालयात तहसीलदार पदी, संतोष रुईकर यांची माजलगाव तालुका

पान २ वर

# चिंताजनक: कोरोनाप्रमाणेच मंकीपॉक्स रुग्णांचेही विलगीकरण

## सरकारच्या आरोग्य यंत्रणेला महत्वाच्या सूचना; नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण

**मुंबई । प्रतिनिधी**

मंकीपॉक्सचा विषाणू भारताच्या शेजारील देशात म्हणजेच पाकिस्तानात आता येऊन पोहोचलाय. जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सला आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केल्यानंतर राज्य सरकारने याबाबत खबरदारीसाठी आरोग्य यंत्रणेला सूचना जारी केल्या आहेत. विमानतळे बंदरांवरून मंकीपॉक्स रुग्णांच्या



सर्वेक्षणासाठी राज्य सरकारने आरोग्य अधिकारी यांची नियमित समन्वय ठेवण्याचा सूचना केल्या असून मंकी पॉक्स रुग्णांच्या विलगीकरणासाठी यंत्रणा उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पान २ वर

### रुग्णांनी काय काळजी घ्यावी?

*मंकीपॉक्सचा जर संसर्ग झालेला असेल तर रुग्णाने ट्रिपल मास्क लावणे आवश्यक आहे. रुग्णाच्या कातडीवरील पुरळ फोड पूर्ण झाकलेली असावीत. यासाठी त्याने लांब बाह्यांचे शर्ट, आणि पॅन्ट वापरावी. रुग्णाच्या कातडीवरील फोड पुरळ पूर्ण बरे होत नाहीत आणि त्यावरील खपल्या गळून जात नाहीत तोपर्यंत त्याला विलगीकरणात ठेवणे आवश्यक आहे. रुग्णाला लक्षणानुसार उपचार द्यावे, पाण्याचे प्रमाण घेईल याची दक्षता घ्यावी.*

### मंकीपॉक्स होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी?

*मंकी पॉक्स न होण्यासाठी काय काळजी घ्यावी यासाठी ही सरकारने मार्गदर्शक सूचना जाहीर केली आहे. त्यानुसार आरोग्य संस्थांमध्ये मंकीपॉक्स रुग्णांवर उपचार करताना पीपीई किटचा वापर करण्यासह सविस्तर मार्गदर्शक सूचना आरोग्य यंत्रणेला देण्यात आले आहेत. काल दिल्लीत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची सर्व राज्यातील आरोग्य यंत्रणे सोबत बैठक झाली. या बैठकीनंतर नेमका काय उपचार व्हावा? कशा पद्धतीने रुग्ण मिळाल्यास पुढे यावे या संदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या.*

cmyk

cmyk



## अग्रलेख

# मीठ, साखरेत प्लास्टिक?

सर्वच स्वयंपाकघरांत मीठ, साखर हे पदार्थ असतातच. मीठ आणि साखरेशिवाय जेवणाला चवच येत नाही. मिठाचा वापर जेवणाची चव वाढवण्यासाठी केला जातो तर साखरेचा वापर गोड पदार्थ, चहा-कॉफी बनवण्यासाठी केला जातो. दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये मीठ-साखरेचा वापर केला जातो पण आता मीठ आणि साखर खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. कारण नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून या पदार्थांमध्ये मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत म्हणे! भारतातील बाजारपेठेत विकल्या जाणाऱ्या सर्व ब्रँडच्या मीठ आणि साखरेमध्ये मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत.

'टॉक्सिक्स लिंक' या पर्यावरण संशोधन संस्थेने केलेल्या अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे. यासाठी संस्थेने पांढरे मीठ, सेंद्रीय खडे मीठ, समुद्री मीठ आणि कच्चे मीठ यासह इतर १० विविध घटकांचा अभ्यास केला. तसेच त्यांनी ऑनलाईन आणि बाजारपेठेमधून खरेदी करण्यात आलेल्या साखरेच्या नमुन्यांची तपासणी केली असता त्यात फायबर, पेलेट्स, फिल्म्स आणि इतर तुकडे आढळून आले. मीठ आणि साखरेमध्ये आढळून आलेले मायक्रोप्लास्टिक्स मानवी आरोग्यासाठी घातक आहे ही मोठी चिंतेची बाब असून मायक्रोप्लास्टिक्सचा मानवी आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

मीठ आणि साखरेमध्ये सापडलेले प्लास्टिकचे कण अन्न, पाणी आणि हवेतूनही मानवी शरीरात प्रवेश करू शकतात. आजकाल लोकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढत आहे. गंभीर आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, लोक आपल्या खाण्या-पिण्याच्या सवयींमध्ये चांगले बदल करीत आहेत. अनेकांनी आपल्या जेवणातील मीठ-साखरेचे प्रमाणही कमी केले आहे. मात्र, साखर-मिठाशी संबंधित एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. त्यानुसार आयोडिनयुक्त मीठ आणि उत्तम दर्जाची साखर विकण्याचा दावा करणाऱ्या बाजारातील नामांकित कंपन्या मानवी आरोग्यासाठी हानीकारक आहेत म्हणे. मायक्रोप्लास्टिक्स हे अत्यंत लहान प्लास्टिकचे कण आहेत. ते इतके बारीक आणि सूक्ष्म असतात की ते सहज डोळ्यांना दिसू शकत नाहीत. प्लास्टिकचे हे कण किती धोकादायक आहेत आणि यामुळे कर्करोगाचा धोका निर्माण होऊ शकतो का याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही. या संदर्भातील काही संशोधनात असे म्हटले आहे की, मायक्रोप्लास्टिकमुळे शरीरात सूज आणि इतर समस्या उद्भवू शकतात.

जेव्हा हे कण शरीरात दीर्घकाळ राहतात तेव्हा ते पेशींना नुकसान पोहोचवू शकतात. त्यासाठी रोजच्या जीवनशैलीतून प्लास्टिकचा वापर करणे टाळावे लागेल. विशेषत: खाद्यपदार्थ प्लास्टिकमध्ये ठेवले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. नॉर्मल पाणी पिण्याऐवजी फिल्टर केलेले पाणी प्यायला हवे. प्लास्टिकच्या बाटल्यांमधील पाणी पिणेही टाळावे लागेल कारण यातूनही मायक्रोप्लास्टिकचा धोका उद्भवू शकतो. बाजारातून तयार मसाले विकत घेण्याऐवजी घरीच मसाले बनवणे चांगले. मायक्रोप्लास्टिकचा आकार ०.१ ते ५ मि.मी.पर्यंत नोंदवला गेला आहे. आयोडीनयुक्त मिठातही मायक्रोप्लास्टिकचे प्रमाण जास्त आढळून आले. त्यात सूक्ष्म तंतूच्या स्वरूपात सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले. संशोधनाचा उद्देश मायक्रोप्लास्टिक्सचा डेटाबेस गोळा करणे हा होता. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय प्लास्टिक करारांतर्गत सर्व संघटनांचे लक्ष या मुद्यावर केंद्रित करता येईल. मायक्रोप्लास्टिकचे धोके कमी करण्याचा त्यांचा उद्देश आहे. राज्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना राज्य सरकारमार्फत महिन्याला मोफत तांदूळ आणि गहू वितरित केले जाते.

मात्र, अलीकडे रेशनवर मिळणाऱ्या तांदळातही प्लास्टिकसदृश तांदूळ मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे रेशनवर निकृष्ट दर्जाचा तांदूळ मिळतो असा समज अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. हा तांदूळ खावा की नाही असा प्रश्न केला जात आहे. परंतु रेशनच्या तांदळात असे तांदूळ आढळले तर ते प्लास्टिकचे नव्हे, पौष्टिक तांदूळ आहेत असा खुलासा करण्यात आला आहे. हा तांदूळ शिजवल्यानंतर त्याचे बारीक पीठ होते. त्यामुळे नक्की हा तांदूळच आहे का अशी शंका येणे साहजिक आहे. आता पॅक्ड फूडसाठी (डबाबंद) नवीन नियमानुसार कंपन्यांना ठळक आणि कॅपिटल अक्षरांमध्ये मीठ, साखर आणि चरबीचे प्रमाण घोषित करावे लागणार आहे. पॅक केलेल्या पदार्थासंबंधीची माहिती ठळक अक्षरात आणि ठळक फॉन्टमध्ये दाखवावी लागेल. पॅक केलेल्या खाद्यपदार्थांच्या लेबलवर मीठ, साखर आणि सॅच्युरेटेड फॅटची माहिती देणे अनिवार्य करण्यात येत आहे. बाजारात अशी अनेक उत्पादने विकली जातात जी आरोग्यदायी म्हणून पॅक केली जातात. परंतु त्यात अनेक असे घटक असतात ज्यामुळे ती आरोग्याला नुकसानकारक ठरतात. अलीकडे पिझ्झा, बर्गर आणि कोल्ड्रिंक्स खूप लोकप्रिय बनली आहेत.

जंकफूड हे आपल्या आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. त्यामुळे वजन वाढण्यासोबतच उच्च रक्तदाब, मधुमेह यासारख्या अनेक गंभीर आजारांचा धोका वाढत आहे. अशा पदार्थांच्या अतिसेवनामुळे व्यक्तींमध्ये तणाव आणि चिडचिडेपणाच्या समस्या दिसून येत आहेत. जंकफूडमध्ये शरीरासाठी आवश्यक पोषकतत्वे फार कमी असतात. फायबरचा अभाव आणि साखरेचे प्रमाण जास्त असल्याने रक्तातील साखर वाढते. ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो तसेच लठ्ठपणाला धोकादायक टप्प्यावर जाण्यास मदत होते. त्यामुळे हे धोकादायक प्रकार टाळण्यासाठी आहारात हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली धान्ये, फळे यांचा समावेश करणे अत्यंत निकडीचे बनले आहे. बदलती जीवनशैली, पोषक आहाराचा आणि व्यायामाचा अभाव, वाढते ताणतणाव आदी कारणांमुळे आरोग्यविषयक समस्या वाढताना दिसत आहेत. पूर्वी रानमेवा भरपूर प्रमाणात घेतला जायचा, आज त्याचीच गरज आहे.

# पीएचडी लाभार्थ्याकडून ५० हजाराची लाच घेतली विद्यापीठातील संशोधकासह चौघांवर गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

**ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात पीएचडी करणार्या तक्रारदाराला फिलोशिपची रक्कम मिळण्यासाठी प्रोग्रेस रिपोर्ट, स्वंयघोषणा पत्र, हजेरी पत्रक प्रमाणपत्र तिमाही, सहामाही प्रोग्रेस रिपोर्ट यावर सह्या व पोझिटीव्ह रिपोर्ट देण्यासाठी ५० हजाराची लाच मागणी केल्याची व लाच स्वीकारल्याससचा आरोप आहे. ही कारवाई १९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये मिल कॉर्नरजवळ जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. याप्रकरणी पोलिसांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संशोधक श्रीमती डॉ. एराज सिद्दीकी,डॉ. रफिक झकेरिया, शेख उमर शेख गणी, डॉ. सिधीकी मो. फैसोहीन ऊर्फ समीर मो. रियाजोद्दीन व सिद्दोकी फराज मो. रियाजोद्दीन रा. संभाजीनगर यांच्यसाविरूध्द लाचेचा गुन्हा नोंद केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे. तर एक जण फरार आहे.**

तक्रारदार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ग्रंथपाल व माहितीशास्त्र या विषयात पीएचडी करीत आहे. तक्रारदार यांना महाराष्ट्र शासनाचे महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपुर यांचेकडुन अधिछात्रवृत्ती फेलोशिप म्हणुन दरमहा ५०.४०० रुपये मिळत आहे. सदर फेलोशिप तक्रारदार यांना मिळण्यासाठी तक्रारदार यांचे प्रोग्रेस रिपोर्ट, स्वंयघोषणा पत्र, हजेरी पत्रक, कठ- प्रमाणपत्र, तिमाही सहामाही प्रोग्रेस रिपोर्ट यावर आलोसे क्रं। यांची सही घेवुन सदर कागदपत्रे विदयापीठात सादर करावी लागतात. सदर कागदपत्रावर सहया करण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे रिपोर्ट पोझीटिव्ह देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे दरमहा १०,००० रुपये प्रमाणे लाचेची मागणी करीत आहे. याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे तक्रार दिली. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेची सत्यता पडताळणी केली. त्यामध्ये तक्रारदार यांचेकडे त्यांना मिळणारे फेलोशिप मधुन नोव्हे २०२२ ते नोव्हे २०२६ पावेतो दरमहा १०,००० रुपये प्रमाणे एकुण ५,००,००० रुपये लाचची पंचासमक्ष मागणी करुन त्यातील ५०,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडून ५० हजाराची लाच घेतांना सिधीकी फराज यांना घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहाथ पकडले. याबाबत बेगमपुरा छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधिक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलिस अधिक्षक मुकूंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली जालन्याचे पोलिस निरीक्षक शंकर एम मुटेकर यांनी केली. सदर कारवाईसाठी पोलिस हवालदार गजानन घायवट, शिवाजी जमधडे, गणेश चेके, गजानन खरघाठत, गणेश बुजाडे, जावेद शेख, शिवलिंग खुळे, आशा कुटे, चालक भालचंद्र बिनोरकर, विठ्ठल कापसे यांनी मदत केली.

# काँग्रेसची विचारधारा सर्वांना सोबत घेऊन चालणारी-सुरेशकुमार जेथलिया

परतुर । प्रतिनिधी

काँग्रेसची विचारधारा सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारी असून या चळवळीत शेतकरी व आजच्या युवा वर्गाने सहभागी व्हावे असे आवाहन माजी आमदार श्री. सुरेशकुमार जेथलिया यांनी केले. मतदारसंघात श्री.जेथलिया यांनी कालपासून आयोजित केलेल्या शेतकरी-युवक संवाद यात्रेत ते बोलत होते. शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट रोजी पाटोदा येथून श्री गणेशाचे दर्शन घेऊन श्री. जेथलीया यांच्या नेतृत्वात शेतकरी व युवकाशी संवाद यात्रेला सुरवात करण्यात आली. यावेळी या यात्रेला प्रतिसाद देत मोठ्या संख्येने शेतकरी व युवकांनी यात सहभाग नोंदवला. आपल्या भावना व्यक्त करताना श्री. जेथलिया म्हणाले, खर्या अर्थाने लोकशाही टिकून ठेवण्याचे कार्य आजवर काँग्रेस पक्षाने केले होते. मात्र अलीकडे या दहा वर्षाच्या काळात सत्ताधार्यांनी आपल्या मनमानी कारभार करत लोकशाही अडचणीत आणली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सर्वसाधारण शेतकरी, शेतमजूर व युवक वर्गासाठी धोरणात्मक निर्णय न घेतल्याने महागाई, बेरोजगारी व नोकरबंदी असे वाईट दिवस आपल्याला पहावे लागत आहे. हे सामीकरण बदलण्यासाठी व विशेषकरून आपल्या मतदार संघात खरा विकास, समृद्धी व शेतकरी यांच्यासाठी राज्याच्या विविध योजना खर्या अर्थाने राबवण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या बाजूने मजबूत उभे रहा असे आवाहन त्यांनी केले.



# आपली भाषा ही सालंकृत अलंकाराप्रमाणे इज्जतीची असावी-अक्षय ऋषी महाराज

बीड । प्रतिनिधी

उद्गारलेली भाषा ही अलंकाराप्रमाणे इज्जतीची असावी. त्यातील प्रत्येक शब्द हिर्या-मोत्या प्रमाणे कुंदनात मांडलेला आसावा. सर्वप्रथम मर्यादा आणि उच्च माधुर्यता तराजूत तोलावी नंतरच ती उद्गारली जावी. नसता जीभ तर बोलून जाईल मात्र चपला चा मार खाण्याची वेळ डोक्याला न यावी. या शब्दाच्या महत्त्वावर आज आनंद गणेश दरबारात जैन भवन येथे अक्षय ऋषी महाराज बोलत होते. त्यांनी सांगितले शब्दाला ब्रह्म म्हटले आहे. कारण शब्द शक्तिशाली सर्वेसर्वा आहे. म्हणूनच त्याला शब्दाची उपमा दिलेली आहे. शब्द किती समर्थ शक्तिशाली आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. बोलणं तर काय शक्तीतुन निरर्थक आणि बडबड ही केली जाते. जो शब्द वायफळ उच्चारला जातो तो संपत्ती नसतो. सोडलेला तीर आणि उच्चारलेली भाषा ही परत येत नाही. त्याप्रमाणे हा उद्गारलेला शब्द परिसरात भ्रमण करतो. त्याची गुंजन ध्वनी कानावर पडते. त्या शब्दाचा प्रभाव पडतो. चांगल्या शब्दाचा प्रभाव हा केवळ मनावरच पडत नाही तर तो आपले पूर्ण जीवन जगण्यासाठी कामी पडतो. आपल्या उद्गारलेल्या शब्दाचा भाव योग्य आणि चांगला असेल तर समोरच्याची आपणाकडे पाहण्याची वेगळीच भावना ठरते .चांगला विषय चांगला भाव आपले शब्द आपले विचार चांगलेच नाही तर ती मनामध्ये आपल्या विचाराने सामर्थ्य केलेले ठरतात चांगल्या शब्दाचा प्रयोग वायुमंडळामध्ये भ्रमण करतो. असा शब्द प्रतिकारक आपल्या विचारधारेच्या उठलेल्या लहरीतील तरंगाप्रमाणे भ्रमित होतो .ज्याप्रमाणे सरोवरात कंकर फेकून एक चक्रवलय निर्माण केले जाते. त्याप्रमाणे आपला शब्दही निसर्गरूपी सरोवरात गुंजला जातो. महापुराचे पाणी मर्यादा सोडून विनाशकारी ठरते तर उच्चारलेले अभद्र शब्द मर्यादा सोडून विनाशाला कारणीभूत ठरतात. यासाठी शब्द वापरताना तोलून मापून वापरणे गरजेचे पडते. कोणाला बोलताना वाईट बोलू नये आणि चांगले बोलल्या शिवाय राहू नये. निंदा ही एक प्रकारची विष आहे त्याला कोणी प्राशन करण्याचे मनात आणत नाही. प्रशंसा अशी थंडाई आहे तिला पिणे मात्र पसंत करतात. जे जे लोक जे आवडते ते त्यांनी करावे. आपण बोलताना अद्वातद्वा कधी बोलू नये. याचा परिणाम समोरील वातावरणावर आणि आपल्या संस्काराने होणार्या आपल्या पिढीवर पडतो. आपण उच्चारलेली वाणी त्यांच्या काळजाला भिडते आणि ते त्याप्रमाणे तिचं अनुकरण करतात.

# राजेंद्र मस्केंना बांधली आशिर्वादाची राखी

## लाडकी बहीण योजनेने महिलांना मिळाला सक्षम आधार-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

**बहिण भावांच्या नात्यातील उत्कट जिव्हाळा व अतूट प्रेम जोपासुन बहिणींचा सन्मान करणारा राखी पौर्णिमा सणाला भारतीय संस्कृतीत अनन्य साधारण महत्त्व आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करून राज्यातील बहुतांश महिलांना सन्मानजनक सक्षम आधार दिला. आगामी काळात भगिनींचे आशीर्वाद वरदान ठरतील.**



अशी अपेक्षा व्यक्त करून राजेंद्र मस्के यांनी भगिनींना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.मुख्यमंत्री लाडकी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र भगिनी पर्यंत पोहोचवण्यासाठी भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून भाजपा कामगार मोर्चाच्या पुढाकाराने संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय येथे मोफत नाव नोंदणी अभियान राबवण्यात आले .अभियानांतर्गत सुमारे २००० पेक्षा अधिक महिलांनी आपली नाव नोंदणी केली. यापैकी ७५ टक्के महिलांचे मानधन त्यांच्या खात्यात जमा झाले. महिलांच्या उत्स्फूर्त पुढाकारातून राजेंद्र मस्के यांच्या संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात रक्षा बंधनाचा गोड कार्यक्रम शेकडो महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महिलां भगिनींनी राजेंद्र मस्के यांचे औक्षण करून राखी बांधली. यावेळी प्रत्येक भगिनींना साडी सप्रेम भेट दिली .या सांस्कृतिक कार्यक्रमास माजी जिप उपाध्यक्ष जयश्रीताई मस्के, लाडकी बहीण योजनेचे प्रदेश सहप्रभारी ओमप्रकाश गिरी.कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव तथा मराठावाडा अध्यक्ष दादासाहेब ननावरे, कामगार मोर्चा मराठावाडा उपाध्यक्ष लालासाहेब पन्हाळे, मारुती तिपाले,लताताई मस्के,मनिषाताई स्वामी, नेहा माळी, गीताताई काळे, मनीषाताई मुंडे, वैशाली नन्नवरे, गीतांजली ननवरे, कविताताई गिरी, अंजलीताई गिरी,बाळासाहेब सोलनकर .गणेश तोडेकर, सुरेश माने, राकेश बिराजदार,अजय ढाकणे, अविनाश नवले,आदी सह महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# पत्रकार भापकर यांची आत्महत्या

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील सुखापुरी लगत असलेल्या लखमापूरी येथील दैनिक सामनाचे पत्रकार विष्णू श्रीरंग भापकर (वय ४४) यांनी आजारपण व आर्थिक विवंचनेतून राहत्या घरी १९ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी १२.०० वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली. विष्णू भापकर यांना ३ एकर जमीन असून ते अल्पभूधारक आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक व बचत गटाचे त्यांच्यावर कर्ज होते. मागील पाच महिने अगोदर त्यांना अर्धांगवायूचा आजार जडला होता. यामुळे भापकर यांनी



टोकाचे पाऊल उचलले. सुखापुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल शिंनगारे, व वाघमारे यांनी प्रेताचे शव विच्छेदन केले. प्रेताची उत्तरीय तपासणी करून प्रेत नातलगच्या ताब्यात देण्यात आले. भापकर यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

पान १वरून...

## ऐतिहासिक कृषी महोत्सवाची

त्याचबरोबर विक्रेत्यांसाठी शेकडो वॉटरप्रूफ स्टॉल्स यासह वाहन पार्किंग, भोजन आदी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान या कृषी महोत्सवात राज्यभरातून शेतकरी तसेच शेती विषयी आवड असणारे नागरिक सहभागी होणार असून त्यांच्या सर्व मान्यवरांच्या स्वागतासाठी संपूर्ण परळी वैद्यनाथ नगरी सज्ज झाली आहे. बीड जिल्ह्यात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होत असल्याने जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह कृषी विभागाच्या अधिकारी - कर्मचारी तसेच पदाधिकाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात प्रथमच होत असलेल्या या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांसह शेतकरी बांधवांना अनेक प्रकारचे लाभदायक मार्गदर्शन मिळणार असून ही शेतकऱ्यांसाठी एक आगळी वेगळी पर्वणी ठरणार आहे तरी राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

------------

## ..तर मी राजीनामा देईन

ते एकतर मी केले. माझ्यानंतर एकनाथ शिंदेंनी केले आणि शिंदेंच्या पाठीशी मी भक्कमपण उभा राहिलो आहे. त्यामुळे अशाप्रकारे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अतिशय अयोग्य आहे. मी पुन्हा सांगतो जर एकनाथ शिंदेंनी सांगितले की मराठा आरक्षणासाठी त्यांना निर्णय घ्यायचा आणि त्या निर्णयामध्ये मी अडथळा निर्माण केला आहे, मी तो निर्णय होऊ दिला नाही, त्याचक्षणी मी राजीनामा देईन. तसेच राजकारणातून संन्यासही घेईन, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

------------

## लाडक्या बहिणीमुळे महाराष्ट्रात

वेळ येऊ शकते. लाडकी बहीण योजना आणि लांबलेल्या निवडणुकीचे थेट कनेक्शन हे मतदार महिलांशी आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला राज्यात मोठा फटका बसल्यानंतर मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करुन महिलांना दर महिना दीड हजार रुपये देण्याचे निश्चित करण्यात आले. रक्षाबंधनच्या पूर्वीच या योजनेअंतर्गत दोन हफ्ते लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा करण्यात आले. मात्र हरियाणा आणि जम्मू-काश्मीरसोबतच राज्यातील निवडणूक लागली असती तर आचारसंहिता लागू झाली असती आणि त्याचा फटका या योजनेला बसला असता असे सूत्रांचे म्हणणे आहे. विधानसभेला महिला मतदारांना महायुतीकडे आकर्षित करण्यासाठी लाडकी बहीण योजना अधिक अधिक महिलांपर्यंत पोहचवण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे. सदर योजनेने किमान २ ते ३ हफ्ते महिलांच्या खात्यावर जमा झाल्यास महिलांचा विश्वास संपादित करणे अधिक सहज शक्य होईल असा तर्क बांधला जात आहे. आचारसंहिता लागू होऊन हा साऱ्या नियोजनात मिठाचा खडा पडू नये म्हणून निवडणूकच जितकी शक्य तितकी लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न आहे. राज्यातील विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाचीही तयारी असल्याचे स्पष्ट संकेत नवी दिल्लीमधील पत्रकार परिषदेत मिळाले. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी गरज पडली तर महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू केली जाईल असे संकेत दिले आहेत. कोणत्याही राज्यामधील विधानसभेची मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याची मूभा निवडणूक आयोगाला असते. त्यामुळेच विद्यमान विधानसभा २६ नोव्हेंबरला बरखास्त झाली आणि निवडणूक डिसेंबर होणार असेल तर मधल्या कालावधीमध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू शकते अशी शक्यता आहे.

**...तर शिंदे सरकारला अधिक दोन हफ्ते देता येतील**

ऑक्टोबरच्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा झाली तर प्रत्यक्ष मतदानाआधी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत सप्टेंबर व ऑक्टोबर या २ महिन्यांचे हप्ते शिंदे सरकारला महिलांच्या खात्यावर जमा करण्यासाठी वेळ मिळेल. म्हणजेच राज्यामध्ये डिसेंबर महिन्यात निवडणूक होईपर्यंत मतदार महिलांच्या खात्यावर किमान ६ हजार रुपयांचे हफ्ते जमा झाले असतील अशी आकडेमोड सांगितली जात आहे.

------------

## रक्षाबंधन: बहिण-भावाच्या

गोपीनाथ मुंडे यांनी मला मुलगा मानलं होतं, तेव्हापासून राखी बांधून घेतो, असे म्हटले. तर मंत्री अदिती तटकरे यांनीही धनंजय मुंडे यांना राखी बांधली. राखी बांधल्यावर भाऊ धनंजय यांनी आपल्या चारही लाडक्या बहिणींना विशेष भेटवस्तू दिल्या. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या रक्षाबंधनाने बहिण-भावाच्या नात्यातील गोडवा जपण्याचे काम केले आहे.

--------------

## राज्यातील ६ तहसीलदारांच्या

तहसीलदार पदी ,मलिक विराणी यांची वर्धा जिल्ह्यातील सेलू तहसीलदार पदी ,अरविंद हिंगे यांची नागपूर जिल्ह्यातील कुही तहसीलदार पदी ,श्रीमती सुनंदा भोसले यांची पुणे जिल्ह्यातील तहसीलदार तथा सहाय्यक पुनर्वसन अधिकारी वडिवळे प्रकल्प या ठिकाणी तर शितल रसाळ यांची रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार पदी नियुक्ती करण्यात आली आहे. या बदल्या निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार करण्यात आल्या आहेत. यातील मलिक विराणी एक तहसीलदार निवडणूक कामकाजाकरता अधिष्ठित असलेल्या पदावर कार्यरत असल्याने हे काम कर संपेपर्यंत याच पदावर कार्यरत असतील.उर्वरित तहसीलदारांनी बदलीच्या ठिकाणी संबंधित तहसीलदारांनी तात्काळ रुजू व्हावे. कुठलीही सबब सांगू नये आणि संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांनी या काळात या तहसीलदारांना रजाही देऊ नये असे केल्यास शासनाच्या वतीने शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असेही शासनाचे सहसचिव अजित देशमुख यांनी आदेशात म्हटले आहेत.

-------------

## अतिवृष्टीमुळे पाटोदा तालुक्यातील

करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी. अशी मागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी केली आहे. पाटोदा तालुक्यात शुक्रवार (१६ ऑगस्ट) रोजीपासून ढगफुटी सदृश्य पाऊस झाला.यामुळे खरिपातील, मुग, उडीद, तुर, बाजरी पिकांचे अतोनात नुकसान झाले.अनेक वर्षानंतर कडधान्य व तृणधान्य तसेच अन्नधान्याची सुगी चांगली होणार असल्याचे चित्र दिसुन येत असतानाच तीन चार दिवसापासून सततच्या झालेल्या पावसामुळे होत्याचं नव्हतं झालं,पावसामुळे पिके पाण्याखाली गेली, शेतजमीनी खरडून गेल्या. या आसमानी संकटामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी योग्य ती कारवाई करावी अशी सुचना माजीमंत्री सुरेश धस यांनी तहिसलदार निलावाड यांना दिली आहे. नुकसानभरपाईसाठी प्रयत्न करणार असल्याचे माजी मंत्री सुरेश घस यांनी सांगीतले.

----------

## संभाजी भिडे काही बोलण्याच्या

असा प्रश्न संभाजी भिडे यांनी केला. त्यावर संभाजी भिडे काही बोलण्याच्या लायकीचे व्यक्ती आहेत का असे म्हणत शरद पवार प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांवरच भडकले. मराठ्यांनी आरक्षण का मागावं? मराठ्यांना देश चालवायचा आहे, मराठा ही देशाचा संसार चालवणारी जात आहे असे वक्तव्य संभाजी भिडे यांनी केले होते. त्यावर बोलताना शरद पवारांनी ही प्रतिक्रिया दिली. संभाजी भिडे यांनी केलेल्या वक्तव्यावर पत्रकारांनी शरद पवारांना प्रश्न विचारला. त्यावर शरद पवार भडकले. संभाजी भिडे हे काही बोलण्याच्या लायकीचे व्यक्ती आहेत का असा प्रतिसवाल त्यांनी केला.

**काय म्हणाले होते संभाजी भिडे?**

सांगलीमध्ये एका कार्यक्रमात बोलताना संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणावर प्रतिक्रिया दिली होती. मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे, पण मराठ्यांनी आरक्षण मागावे का? मराठ्यांनी उभा देश चालवायचा आहे, आरक्षण कुठले काढले? मराठा जात संपूर्ण देशाचा संसार चालवणारी जात आहे हे ज्यावेळी मराठ्यांच्या लक्षात येईल त्या दिवशी या मातृभूमीचे भाग्य उजळून जाईल. मात्र हे मराठ्यांच्या लक्षात येत नाही हे दुर्दैव आहे असे संभाजी भिडे म्हणाले होते.

-----------

## चिंताजनक: कोरोनाप्रमाणेच

मंकीपॉक्स हा सौम्य स्वरूपाचा आजार असून रुग्ण दोन ते चार आठवड्यात बरा होतो परंतु लहान मुलांमध्ये आणि इतर काही रुग्णांमध्ये तर गंभीर स्वरूप ही धारण करू शकतो. या आजाराचा मृत्यू दर सर्वसाधारणपणे तीन ते सहा टक्के असल्याने राज्य सरकारने आरोग्य यंत्रणेला मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. मंकीपॉक्स संदर्भात विमानतळे आणि बंदरांवर सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून खातरजमा करून संशयित रुग्णांना विलगीकरणात उपचारासाठी आवश्यक यंत्रणा उभारावी अशा सूचना आरोग्य यंत्रणेला देण्यात आल्यात. मंकीपॉक्स रुग्णाला विलगीकरण कक्षात आणि घरच्या घरी वेगळ्या खोलीत ठेवणं आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. स्वतंत्र व्हेंटिलेशनची व्यवस्था या रुग्णांसाठी असावी असेही या मार्गदर्शक सूचनेत म्हटले आहे.

-----------

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४



## महेश मंदिरामध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवास आजपासून सुरुवात

**आष्टी :** आष्टी तालुक्यातील कडा येथील पुरातन अशा महेश मंदिरामध्ये श्रावण मासानिमित्त वै. ह भ प मदन महाराज व वै.ह भ प गोरक्षनाथ महाराज ढमाले यांच्या कृपाशीर्वादाने ह भ प बबन महाराज बहिरवाल व ह भ प दादा महाराज चांगुणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात ज्ञानेश्वरी ,शिवमहापुराण ग्रंथ पारायण ,काकडा,भजन,विष्णु सहस्रनाम,गीतापाठ,ज्ञानेश्वरी पारायण ,संत कथा,हरिपाठ, किर्तन आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत .याप्रसंगी दररोज दुपारी अडीच ते साडेपाच या वेळेत ह भ प कारभारी महाराज धस हे संत चरित्र कथा मधुर वाणीतुन सांगणार आहेत.तर दररोज रात्री सात वाजता ह.भ.प चंद्रकांत महाराज खलेकर, श्रीहरी महाराज चांगुने, शिवाजी महाराज फुंदे, निळकंठ महाराज तावरे, राऊत दादा महाराज, ज्ञानेश्वर महाराज सुडके, पांडुरंग महाराज जाधव गुरुजी

यांचे किर्तन होणार असून गुरुवार दि ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा.ह. भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताह सोहळ्याची सांगता होणार आहे. परिसरातील भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांनी केले

# सरकारने किसान सम्मान योजनेची रक्कम १२ वरुन २४ हजार रुपये करावी -भिमराव धोंडे

## श्रीमती विजयाताई घुले यांच्या हस्ते डॉ. स्वामिनाथन यांच्या प्रतिमेची पुजा

**आष्टी प्रतिनिधी**

किसान सन्मान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपये मिळतात परंतु खते व औषधांची वाढलेले दर यामुळे शेतकऱ्यांना खर्च परवडत नाही त्याामुळे सरकारने ही रक्कम दुप्पट करून २४ हजार रुपये करावेत असे मत माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे व्यक्त केले.

दिनांक २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत आष्टी येथे होणाऱ्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या मंडप उभारणी मुहूर्त कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते, या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून केळ सांगवी येथील आदर्श महिला शेतकरी श्रीमती विजयाताई गंगाधर घुले, बाबुराव कदम, सदाशिव दिंडे, व्यापारी संघटनेचे नविन कासवा,कृषी व्यापारी संघटनेचे तालुकाध्यक्ष अमृत शेळके, श्री. बोंदार्डे, यशोदिप कन्स्ट्रक्शन कंपनीचे बाळासाहेब भुकन, सुधीर पारखे,बंडू सातपुते, गणेश जठार, प्राचार्य श्रीराम आरसुळ, प्रा. खेभकर व इतर उपस्थित होते. आदर्श महिला शेतकरी श्रीमती विजयाताई घुले यांच्या हस्ते डॉ. स्वामिनाथन यांच्या प्रतिमेची पुजा करुन श्रीफळ वाढवुन अभिवादन करण्यात आले. मा. आ. भिमराव धोंडे यांच्या हस्ते श्रीमती विजयाताई घुले यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल सत्कार करण्यात आला.

मराठवाड्यातील सर्वात मोठे व २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या डॉ.स्वामीनाथन दुसरे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आष्टी येथील पंडित नेहरू विद्यालयाच्या प्रांगणात होत आहे.

या प्रदर्शनाच्या भव्य मंडप उभारणीस प्रारंभ झाला आहे. पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, डॉ. स्वामिनाथन यांनी शेतकऱ्यांच्या मालाला जास्तीचा भाव कसा देता येईल यासाठी प्रयत केले.त्याांनी शेतीसाठी भरीव कार्य केले. त्याांनी गहु, तांदळाच्या जादा



उत्पन्न देणाऱ्या जातींचे संशोधन केले. या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना शेती विषयक नवनवीन ज्ञान मिळेल, त्याचा आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी फायदा होईल. गतवर्षी सव्वा लाख शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला यावर्षी दोन लाख शेतकरी लाभ घेतील. आर्थिक उलाढाल देखील वाढणार आहे. शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी अत्यांत उपयुक्त आहेत. शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत राज्य व केंद्र सरकारचे मिळून वार्षिक १२ हजार

रुपये मिळतात परंतु शेती करणे आर्थिकदृष्ट्या अवघड झाले आहे त्याामुळे शासनाने शेतकरी सन्मान योजना रक्कम दुप्पट करून वार्षिक २४ हजार रुपये द्यावेत असे माझे मत आहे. कृषी मंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे, भाजपाच्या नेत्याा आ. पंकजाताई मुंडे, आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे . सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे तर ठराविक रक्कम भरून शेतकऱ्यांना वीस किलोमीटर अंतर हेलीकॉप्टरने हवाई सफरीचा आनंद घेता येईल. चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घेऊन आपल्या शेतीसाठी उपयोग करावा. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढतच राहिली तर भविष्यात अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल यामध्ये अन्नधान्य, पाणीप्रश्न निर्माण होईल. अनेक समस्या निर्माण होतील यावर उपाय करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ञांची समिती गठीत करावी त्याामध्ये प्रत्योक राज्यातील एका तज्ञांचा समावेश करावा. १९४७ साली भारत, पाकीस्तान, बांगलादेश ,मॅनमार या सर्वांची मिळून लोकसंख्या ३२ कोटी होती. आज ७५ वर्षात फक्त भारताची लोकसंख्या सुमारे १५० कोटींवर पोहोचली आहे. इतर देशांची मिळून २०० कोटी असु शकते आणखी पुढच्या ८० ते १०० वर्षात हीच लोकसंख्या ८०० ते ९०० कोटीवर जाऊ शकते. परंतु जमिनीचे क्षेत्र मात्र तेवढेच राहणार आहे. त्याामुळे भविष्यात अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. वाढत्याा लोकसंख्येमुळे संपूर्ण देशाच्या यंत्रणेवर ताण येतो. वाढती महागाई, आरोग्य सेवा, शिक्षण,बेरोजगारी, गरीबी, भूकबळी असे बरेच प्रश्न उभे राहतात. वाढत्याा लोकसंख्येमुळे सरकारच्या योजना प्रत्योकापर्यंत पोहोचणे देखील कठीण होते. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन माहिती मिळते शेतीसाठी लागणारे नवनवीन अवजारे, जास्त उत्पन्न घेण्यासाठी नवनवीन माहिती अशा प्रदर्शनामधून मिळते असेही मा.आ.भिमराव धोंडे सांगितले.

## ग्रामसेवक आदर्श पुरस्काराने सन्मानित

अंबड ( प्रतिनिधी)

अंबड तालुक्यातील नांदी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक विजय झीने यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देण्यात आला आहे. स्वातंत्र्या दिनानिमित्त मंगळवार दि. १५ ऑगष्ट रोजी जालना येथील मुक्तेश्वर लॉन्सवर आयोजित सोहळ्यात त्याांचा सपतीक सन्मान करण्यात आला.

हा पुरस्कार जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल,महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण,ग्रामसेवक युनियनचे




संजीव निकम यांच्या हस्ते देण्यात आला.

आदर्श ग्रामसेवक पुरस्कार हा ग्रामीण भागातील जनतेचे राहणीमान उंचाविण्यास आणि अडीअडचणी सोडविण्यास सर्वतोपरी मदत केल्याने हा पुरस्कार देण्यात आला आहे. याबद्दल त्याांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.



## वाढदिवसाचा खर्च टाळून सामाजिक कार्य

**आष्टी : सामाजिक बांधिलकी जपत सहकार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने युवा उद्योजक महेश हंबर्डे, युवा नेते नानासाहेब ढोरमारे मा सरपंच व महावितरणचे शिवाजीराव मार्कंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विनाकारण चा खर्च टाळून समाजिक बांधिलकी जपत आष्टी येथील पंचायत समिती आवारातील शाळांमध्ये विद्यार्थासाठी शालेय साहीत्य वाटप केले. यावेळी युवा उद्योजक महेश हंबर्डे युवा नेते नानासाहेब ढोरमारे व महावितरण चे शिवाजीराव मार्कंडे या च बरोबर इजिनियर चंद्रकांत धस ,समिर पोकळे शरद कदम वकील, प्रशांत द्वारके, माऊली गोरे, गणेश पोकळे, वैजिनाथ डहाळे, मयुर आधापुरे, विशाल शेट्टी, निलेश सोनवणे, स्वप्निल नखाते, सचिन भौगाडे, साबेर बेग, शहर व सर्व सहकार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे संचालक उपस्थित होते.**

पान ६ वरून...

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गडावर

पंचक्रोशीतील सर्व बंजारा समाज व भक्तगण यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांसह पंचक्रोशीतील टाळकरी, वारकरी तसेच महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती शेवटी पंचक्रोशीतील बंजारा समाज बांधव व भक्तगण मंडळी यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मानवी जीवन सुखी

एन.जी शिनगारे,रविकांत उघडे, धम्मपाल जावळे, वाल्हाबाई टाकणखार, लीलाताई उजगरे, उपस्थित होते. तर दीपक भालेराव, कचरू खळगे, डॉ.श्रीराम खळगे,लक्ष्मण पोटभरे,बाबासाहेब जाधव, जीवन डोंगरे माजी नगरसेविका सुधमाती पौळ, सुशीलाताई चांदमारे, किरणताई ढाकरगे, विद्याताई निसर्गंध, महानंदा टाकणखार, मीनाताई टाकणखार, तात्यासाहेब साळवे, भगवान जाधव, सदाशिव जाधव आधी तालुक्यातील उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चिंचाळ्यात मंदिराची दानपेटी

पोकळे, कंकालेश्वर विठ्ठल पोकळे, ईश्वर शहाजी पोकळे यांना घेऊन बाबासाहेब देवस्थान मंदिर खटकळी येथे गेले असता तेथे गणेश दत्तू कांबळे हा विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची दानपेटी गजाच्या सहाय्याने फोडत असताना मिळून आला. त्याने मंदिराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडल्याचे व वामनभाऊ मंदिराचेही कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे दिसून आले. याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात गणेश कांबळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अंबाजोगाई पिपल्स को ऑप

स्वरूपात मदत करण्यात येत आहे . तसेच बँक वेळोवेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात देखील अग्रेसर असून ते राबविण्यात यशस्वी देखील झाली आहे .आज बँकेने वार्षिक उलाढालीत ५०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे .या वार्षिक आर्थिक उलढालीचा लेखाजोखा मांडून तो मंजूर करून घेण्यासाठी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि २४ ऑगस्ट २०२४ ,शनिवार रोजी संध्याकाळी ६ वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे . बँकेच्या वार्षिक सभेनंतर लगेच प्रीती भोज व कलारंजन मुंबई निर्मित महाराष्ट्राची लोकसंस्कृती व संगीत परंपरेचा देखणा आविष्कार उदय साटम व ज्याती साटम यांचा ''मराठी लोकधारा'' हा मराठमोळा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचा देखील आस्वाद सर्व ग्राहक, सभासद व शहरवासीयांनी घ्यावा तसेच बँकेच्या २८ व्या आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासद मंडळींनी उपस्थित राहून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळ तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.

### श्री योगेश्वरी देवल कमेटीच्या

करण्याचा मानस नवीन विश्वस्त मंडळाने केला आहे. यापूर्वी देवीच्या मंदिराचे प्रवेशद्वार सकाळी ६ वाजता उघडले जायचे त्याामध्ये बदल करून पहाटे साडे पाच वाजता मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उघडले जात आहे. यामुळे पहाटे लवकर येणाऱ्या भाविकांची मोठी गैरसोय कमी होऊन भाविकांतुन समाधान व्यक्त केले जाते आहे. त्याचबरोबर मंदिर परिसरात असलेल्या पाण्याच्या तीर्थाना लोखंडी जाळी बसविण्यात येणार असून त्याद्वारे तीर्थाची स्वच्छता व त्यांचे पावित्र कायम राहणार आहे.

## पारदर्शक कारभारामुळे सभासद, ठेवीदारांचा विश्वास वाढला – अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सभोवताली नकारात्मक वातावरण असताना देखील सकारात्मक व पारदर्शक कारभारामुळे सभासद, ठेवीदार यांचा विश्वास वाढला आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. बँकींग सेवा योग्य व पारदर्शक ठेवून बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी संचालक मंडळ प्रयतशील आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणा-या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२४ अखेर २ कोटी ५० लाख रूपयांहून अधिकचा करपूर्व नफा झाला असून बँकेकडून ३ टक्के लाभांश जाहीर करीत असल्याची घोषणा दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली.

आर्थिक क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या दीनदयाळ नागरी सहकारी बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कै.गोपीनाथराव मुंडे स्मृती सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान संचालक रा.गो.धाट, संचालक सर्वश्री मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, व्यवस्थापकीय सदस्य ॲड.शिवाजीराव कराड, महादेव इटके आणि मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान भूषवावे याबाबत सुचक म्हणून सभासद डॉ.श्रीकांत बुट्टे यांनी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद




पत्की यांचे नांव सुचविले तर त्याला सभासद संतोष बनसोडे यांनी अनुमोदन दिले. मान्यवरांनी भारतमाता व पं.दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन केले. प्रार्थनेनंतर उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. विश्वजीत धाट यांनी पद्य गायन केले. त्याानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रारंभ झाला. सुरूवातीला संचालक बाळासाहेब देशपांडे यांनी अहवाल वर्षातील दिवंगतांसाठी श्रद्धांजलीचा प्रस्ताव मांडला. त्याानंतर सभागृहाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी बँकेचे संगणक विभागप्रमुख मंगेश गोस्वामी यांनी सायबर सेक्युरिटी हा जनजागृतीपर प्रशिक्षण कार्यक्रम सभासदांसाठी सादर केला. तर सहकार विषयातील तज्ज्ञ श्री.रसाळ यांनी सभासदांना सहकार विषयावर प्रशिक्षण दिले. योगेश्वरी देवल कमेटीवर सचिव म्हणून निवड झाल्याबद्दल बँकेचे संचालक प्रा.अशोक लोमटे आणि कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बँकेचे सभासद शिरीष पांडे यांचा बँकेकडून विशेष सत्कार करण्यात आला. तदनंतर आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकेच्या शाखांना शाखा पारितोषिके (रोख रक्कम, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह) देऊन सन्मानित करण्यात आले. ज्यात लातूर शाखा (प्रथम), देगलूर शाखा (द्वितीय), बीड शाखा (तृतीय) या शाखांचा समावेश आहे. याप्रसंगी उपस्थित सन्माननीय संचालक व मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी विविध ठराव, प्रस्ताव मांडले. त्याला उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मान्यता दिली. सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर सकारात्मक व खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली. सभागृहात उपस्थित सभासद रामचंद्र झंवर, डॉ.गोपाळ चौसाळकर, शिरीष पांडे, गोविंद कुडके, विलास सोमवंशी, सिराजे सर, हरिदास आपेट आणि व्यंकटेश पेन्सलवार यांच्यासह इतरांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मुख्यकार्यकारी अधिकारी बनवसकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत उत्तरे दिली. त्याानंतर अध्यक्षीय समारोप करताना बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी सांगितले की, दीनदयाळ बँकेने ग्राहक, ठेवीदार आणि हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. मागील २८ वर्षांपासून सहकार क्षेत्रात काम करताना बँकेने माणसे जोडण्याचे काम केले आहे. दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२४ (आर्थिक वर्ष २०२३ - २०२४) अखेर आर्थिक वर्षासाठीचे लेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे लाखांत आहेत.) एकूण संकलित ठेवी (५२३४५.३२), एकूण वितरीत कर्जे (३१७९२.०८), एकूण गुंतवणुक (२१८८६.२६), भागभांडवल (१५८१.१९), राखीव निधी (३५.२७ लक्ष), निव्वळ अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ४.९८ टक्के एवढे आहे., निव्वळ मालमत्ता (□३१.४५ कोटी), बँकेकडे (५९०४५.५७) एवढे खेळते भांडवल आहे. बँकेने एकूण (□८४१.३३ कोटी) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ५० लाख ५१ हजार रूपये इतका करपूर्व नफा झाला आहे. १९९६ साली लावलेल्या या बँकरूपी रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

## जालन्यात अनधिकृत श्री चैतन्य टेक्नो स्कुल

### शाळेला १ लाखचा दंड

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील संभाजी नगर येथे श्री चैतन्य टेक्नो स्कुल ही शाळा अनाधिकृत सुरु असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्याा, त्याानूसार शाळेस शासनमान्यता नसतांनाही अनधिकृतपणे शाळा सुरु असल्याचा अहवाल प्राथमिक शिक्षणाधिकारी जालना यांनी दिला आहे. तरी संबंधित अनधिकृत शाळेच्या व्यवस्थापनास १ लाख रुपये दंड ठोठावला आहे तसेच सुचना देवूनही शाळा बंद न केल्यास १० हजार रुपये प्रतिदिन दंड ठोठावण्यात येणार आहे. असे निर्देश जालना पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांनी



पत्रान्वये दिले आहेत.

शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी. शाळेतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नजीकच्या शाळेत करावे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. पालकांकडून घेतलेले प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क तात्काळ परत करावे तसेच दंडाची रक्कम तात्काळ भरण्याची सूचनाही शाळा व्यवस्थापनाला केली आहे. श्री चैतन्य टेक्नो स्कुल ही शाळा अनाधिकृत घोषित झाली असल्याचा ६५ आकाराचा फलक शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ दर्शनीय भागात लावण्यात आलेला आहे. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळील फलक फाडणार किंवा काढणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

## स्वातंत्र्य कुणाला मिळाले हा प्रश्न आजही अनुत्तरीतच –डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा ७८ वा स्वातंत्र्या दिन साजरा करीत असताना आजही आपल्या भोवतालची समाज व्यवस्था पाहताना स्वातंत्र्या कुणाला मिळाले आहे हा निरूत्तर करणारा प्रश्न सदसदविवेक बुद्धी आणि माणुसकी जागृत असणाऱ्या प्रत्योकाच्या मनात घर करून आहे, याचे उत्तर कधी मिळणार असा प्रश्न सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले यांनी व्यवस्थेला विचारला आहे.

धानोरा येथील सेवा मतिमंद विद्यार्थ्यांचे शिक्षण व पुनर्वसन शेतकी प्रशिक्षण केंद्र, सोमनाथ बोरगाव येथे स्वातंत्र्यादिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले हे बोलत होते. यावेळी विचारमंचावर संस्थेचे अध्यक्ष दिनकर गुणाले, उपाध्यक्ष मोहनबापू जगताप, प्रा.डॉ.प्रतीक सिरसाट, डॉ.प्रवीण गुणाले, डॉ.अक्षता गुणाले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाने करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्वातंत्र्यानंतर ७८ वर्षांनी आजही सर्वसामान्य नागरिकांचे अन्न, वस्त्र, निवारा, वीज, रस्ते, पाणी हे मूलभूत प्रश्न अद्याप सुटले नाहीत. ज्यांना रोजचे पोटापाण्याचे प्रश्न, रोजच्या जगण्याचे प्रश्न रोज भेडसावत असतील, त्याांच्यासाठी स्वातंत्र्या काय आणि पारतंत्र्या काय ,काही फरक



पडत नाही त्याामुळे स्वातंत्र्या कुणासाठी हा प्रश्न उपस्थित होतो. आजही आपल्या माताभगिनीवर रोज अत्याचाराच्या बातम्या कानावर येतात ,९ ऑगस्ट रोजी कोलकात्याात वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टर भगिनीवर बलात्कार करून तिची हत्याा केली गेली, रोजच शेतकरी आत्महत्याा करीत आहेत, हजारो युवकयुवती बेरोजगार आहेत, शिक्षण महाग होत आहे, जनता महागाईने त्स्त्रा आहे, निराशेच्या गर्तेत व्यसनाधीन बनत आहे, गुन्हेगार बनत आहेत तर एकीकडे राजकीय सत्तातील लोक कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार करीत आहेत. तो उघड होऊन ही त्याांना राजकीय सरंक्षण मिळत आहे, प्रशासकीय अधिकारी गेंड्याची कातडी पांघरून जनतेच्या हिताच्या विरोधात काम करत आहेत, इडी, सीबीआय सारख्या संस्था पक्षपातीपणा करत आहेत, सरकार सत्तेचा दुरूपयोग करून विरोधकांचा आवाज बंद करण्याचा प्रयत करत आहेत. एकीकडे सर्वसामान्य जनता न्यायाची वाट पाहत आहे. तर एकीकडे अन्यायाची परिसीमा गाठली आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत आहे. गरीब जनतेच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचत नाहीत. हा विरोधाभास या व्यवस्थेमध्ये दिसत असतानाही याविरुद्ध बोलणाऱ्याचा आवाज पद्धतशीरपणे दाबण्यात ही समाजविरोधी व्यवस्था यशस्वी होत आहे. कायद्याचा सामान्य जनतेच्या हितासाठी वापर करायचा सोडून कायद्यातील तुटींचा उपयोग करून, त्त्याा पळवाटा काढून आपला फायदा होईल असे सरकारी धोरण अमलात आणले जात आहे. मग, या ७८ व्या स्वातंत्र्यादिनी स्वातंत्र्या कुणाला मिळाले हा प्रश्न निर्माण झाला आहे असे मत डॉ.इंगोले यांनी मांडले.

cmyk

# ‘या’ तंत्राने गाय प्रत्येक वेळी देईल कालवडीलाच जन्म

## दूध उत्पादन वाढविण्यासाठी बिहार सरकारचे प्रयत्न

पाटणा : बिहार सरकार गायीपासून प्रत्येक वेळी कालवड जन्माला घालण्याच्या तंत्रज्ञानावर कार्य करत आहे. पशुपालकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि राज्यात दूध उत्पादन वाढवण्यासाठी शुक्राणू वर्गीकरण तंत्रज्ञानावर काम करत आहे. या तंत्राच्या मदतीने अवघ्या २५० रुपयांमध्ये गायीपासून कालवड जन्माला येणार आहे.

पशुपालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. वास्तविक, बिहार सरकारने राज्यातील दूध व्यवसाय वाढवण्यासाठी आणि पशुपालकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी उत्कृष्ट तंत्रज्ञानावर काम सुरू केले आहे. बिहार सरकार ज्या तंत्रज्ञानावर काम करत आहे, त्या तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च क्षमतेच्या दुभत्या गायीची एक जात तयार केली जाईल. या जातींचे संगोपन करून पशुपालक कमी खर्चात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. त्याचबरोबर या तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रत्येक वेळी केवळ २५० रुपये खर्चून फक्त कालवड जन्माला येणार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या तंत्रज्ञानावर एकत्र काम करण्यास सुरुवात केली आहे.




जेणेकरून पशुपालकांचे उत्पन्न वाढेल आणि गायींच्या नामशेष होणाऱ्या जाती वाचवता येतील. बिहार सरकार शुक्राणू वर्गीकरण तंत्रज्ञानावर काम करत आहे, जेणेकरून गायींच्या दुभत्या जातीचा जन्म होऊ शकेल. शुक्राणू वर्गीकरण तंत्राने प्रत्येक वेळी फक्त एक कालवड वासरू जन्माला येईल. तेही केवळ २५० रुपये खर्चून हे काम पूर्ण होणार आहे. गायींच्या या जातींपासून पशुपालक सहजपणे जास्त दूध तयार करू शकतात. राज्यातील कोणत्याही गायीतून शुक्राणू वर्गीकरण तंत्र वापरले जाते, वीर्य जास्तीत जास्त दोनदा दिले जाईल. कोणत्याही कारणास्तव कोणत्याही गायीपासून वासरू जन्माला आले नाही, तर अशा परिस्थितीत शेतकरी व पशुपालकांना जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून रक्कम परत केली जाईल. असे सांगण्यात येत आहे.

### याप्रमाणे गायींच्या दुधाळ जाती तयार होतील

प्रसारमाध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा पशुसंवर्धन विभागात गायींच्या दुभत्या जाती तयार करण्यासाठी पुरेशा प्रमाणात वीर्यही उपलब्ध करून देण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी सांगतात की, बैलाच्या वीर्याद्वारे जनावरांचे कृत्रिम रेतन केले जाईल. हे तंत्रज्ञान अशा प्रकारे कार्य करते की गायीपासून फक्त आणि फक्त दुभत्या जातीची वासरे जन्माला येतील, ज्यामुळे पशुपालकांचे उत्पन्न तर वाढेलच पण दूध उत्पादनातही मोठ्या प्रमाणात मदत होईल.

# हळद उत्पादन वाढीसाठी हळद बूस्टर चे महत्त्व



भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली, आणि संत नामदेव सेवाभावी संस्था, संचलित कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूर तर्फे प्रथम पिक पंक्ती प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत (मौजे). गणेशपुर ता. सेनगाव, जि. हिंगोली येथील १० शेतकऱ्यांची निवड करून वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर यांच्या मार्गदर्शनाखाली हळद बुस्टर देण्यात

हळद बुस्टरचे फायदे : पिकांच्या गुणवत्तेत उत्तम प्रकारची वाढ दिसून येत आहे. पिकांचे आरोग्य, गुणवत्ता आणि उत्पादन सुधारते. पाण्यात विरघळणारे आणि साध्या किंवा जटिल मानक खतांशी सुसंगत. सुलभ वाहतूक आणि एक वर्षापर्यंत दीर्घ टिकवण क्षमता.

हळद बूस्टर वापरण्याच्या पद्धती : लागवडीनंतर ६० दिवसांनी आणि ९० दिवसांनी दोनदा फवारणी करावी.

पहिली फवारणी २०० ली पाण्यात एक किलो टर्मरिक बुस्टर घेऊन फवारणी करावी. दुसरी फवारणी ३००-४०० ली पाण्यात दीड ते दोन किलो टर्मरिक बुस्टर घेऊन फवारणी करावी. (प्रमाण : ५ ग्राम प्रती लीटर पाणी) फवारणीची वेळ सकाळी ६ ते ११ वा. व दुपारी ४ ते ६ वा.

हळद बूस्टर वापरताना इतर कोणत्याही वनस्पती संरक्षण रसायनांममध्ये (कीटकनाशके बुरशीनाशके आदि) मिसळू नये. आवश्यक पोषक तत्वांचा पुरवठा करण्यासाठी आणि हळद पिकाच्या वाढीस चालना देण्याकरिता हळद बुस्टर हे सूक्ष्म पोषक आहेत, जमितील झिंक, बोरॉन, लोह सारख्या सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता भरून काढण्यास मदत होते, इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यास चांगला उपयोग होतो.


# भाजीपाल्याचे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी ‘रिले क्रॉपिंग’

भाजीपाला लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धतीद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यातीलच एक पद्धती आहे रिले क्रॉपिंग. शेतकरी भाजीपाला पिकांचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब करू शकतात. रिले क्रॉपिंग सिस्टीम हे एक तंत्र आहे ज्याद्वारे एकाच जमिनीवर वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करता येते. हे एक खास शेती तंत्र आहे ज्याचा अवलंब करून शेतकरी अधिक उत्पादनासोबतच उत्पन्न वाढवू शकतात. विशेष म्हणजे यामध्ये मागील पीक काढण्यापूर्वी पुढील पीक पेरले जाते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञान काय आहे?

रिले क्रॉपिंग सिस्टीम ही एक प्रणाली किंवा तंत्र आहे ज्यामध्ये एका शेतात एक पीक लावले जाते, तर मागील पिकातील उर्वरित ओलावा आणि पोषक तत्वांचा फायदा घेण्यासाठी त्याच शेतात दुसरे पीक नंतर लावले जाते. यामध्ये पहिले पीक काढण्यापूर्वी दुसरे पीक पेरले जाते. त्यामुळे पहिल्या पिकातील ओलावा दुसऱ्या पिकात जातो त्यामुळे सिंचनाची कमी गरज भासते, म्हणजेच कमी सिंचनात जास्त पिकांना या पद्धतीचा फायदा होऊ शकतो. जमीन आणि संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञानाचे फायदे : रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब केल्याने अनेक फायदे मिळतात जसे की, भाजीपाल्याचे बहुपिक घेतल्याने जास्त उत्पादन मिळते. बहुपीक शेतीमुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढू शकते. या



तंत्रज्ञानाचा अवलंब करून वर्षभर रोजगार मिळू शकतो म्हणजेच वर्षभर पैसा मिळवता येतो. मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता नसते. खताचा वापर संतुलित प्रमाणात केला जातो. पीक फेरपालटद्वारे जमिनीचे आरोग्य राखता येते. पाण्याच्या बचतीबरोबरच जमिनीची सुपीकताही राखता येते. या तंत्राने चांगले उत्पादन मिळू शकते, तथापि, पिकाचे चांगले उत्पादन हे जातीची निवड, योग्य पेरणीची पद्धत, संसाधनांचा योग्य वापर, कीड व्यवस्थापन, वेळेवर काढणी या गोष्टींवर अवलंबून असते.

या तंत्राने या भाज्यांची लागवड करता येते : काकडीसह मिरचीची लागवड - बहुपिक शेतीत काकडींसोबत मिरचीची लागवड करता येते. यामध्ये रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून नोव्हेंबर ते मार्च आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर अशी दोनदा पेरणी केली जाते. मिरचीची पेरणी फेब्रुवारीमध्ये शेताच्या बांधावर केली जाते. मटारसह दुधीभोपळा लागवड - या तंत्रात नोव्हेंबर ते एप्रिल आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालावधीत शेती केली जाते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिवाळ्यात दुधीभोपळ्याची रोपवाटिका प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये तयार करावी आणि ती फेब्रुवारीमध्ये तयार केलेल्या बेडमध्ये २.५ मीटर ४५ सें.मी. अंतरावर दोन्ही बाजूला लागवड करावी. काकडी आणि घोसाळे लागवड - या तंत्राने नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काकडी आणि घोसाळ्याची लागवड केली जाते. याशिवाय मार्च ते ऑक्टोबर दरम्यानही लागवड करता येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की घोसाळ्याची पेरणी किंवा रोपण मार्चमध्ये ३ मीटर अंतरावर करावी. बटाटा-कांदा-हिरवळीचे खत लागवड - यांची लागवड सप्टेंबर ते डिसेंबर, डिसेंबर आणि जून-जुलैमध्ये करता येते.


कोणत्या पिकांची रिले क्रॉपिंग करू नये? अशी अनेक पिके आहेत ज्यांची एकत्र पेरणी करू नये कारण अशाच प्रकारच्या भाज्या कीटक किंवा रोगांना संवेदनशील असतात. ते एकत्र घेतल्याने पिकाचे कीड व रोगांमुळे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, पीक पद्धतीमध्ये टोमॅटो आणि मिरची एकत्र पेरता कामा नये.

# जनावरांवर पडणाऱ्या किडी आणि नियंत्रण


दुधाळ जनावरांचे आरोग्य आणि दुधाचे उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी जनावरांच्या शरीरावर येणार्या किडींचे प्रभावी नियंत्रण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. किडींचा प्रादुर्भाव जनावरांना त्रास देतो, रोगांचे प्रसार करतो आणि शेवटी दुधाच्या उत्पादनात घट होते. यामुळे किडींचे योग्य व्यवस्थापन आणि नियंत्रण गरजेचे आहे.

गोचीड : गोचीडमुळे जनावरांमध्ये बाबेशिओसिस आणि अनाप्लास्मोसिस सारखे गंभीर रोग पसरू शकतात. या रोगांमुळे जनावरांची रोगप्रतिकारक क्षमता कमी होते, ताप येतो, रक्तातील लाल पेशींची संख्या कमी होते आणि अशक्तपणा येतो. अकारिसाइड्सचा वापर करून टिक्स नियंत्रण केले जाते. हे रसायन विविध स्वरुपात उपलब्ध असतात, जसे की डिप्स, स्प्रे, किंवा पोर-ऑन. या रसायनांचा योग्य वापर करून टिक्सच्या वाढीला आळा घालता येतो. टिक्सच्या नैसर्गिक शत्रूंना प्रोत्साहन देऊन त्यांचे नियंत्रण केले जाऊ शकते. जसे की पक्षी, जे टिक्स खाऊन त्यांची संख्या कमी करतात. तसेच, काही बुरशी टिक्सवर परिणामकारक आहेत.

माइट्स : माइट्समुळे त्वचेची खाज, जळजळ, आणि जखम होण्याची शक्यता असते. जनावरांमध्ये या समस्येमुळे उत्पादन क्षमता कमी होऊ शकते आणि त्यांची शारीरिक स्थिती खालावू शकते. माइट्स नियंत्रणासाठी विशिष्ट रसायनांचा वापर करावा, जसे की माइटीसाइड्स, जे स्प्रे, डिप्स







किंवा टॉपिकल उपचारांच्या स्वरुपात वापरले जातात. स्वच्छता: जनावरांच्या निवास स्थानांची नियमित साफसफाई आणि निर्जंतुकीकरण करून माइट्सच्या प्रसाराला आळा घालता येतो. संक्रमित जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे ठेवल्याने माइट्सचा प्रसार थांबवता येतो.

ऊवा/ जूं : जूंमुळे जनावरांमध्ये खाज, त्वचेची हानी आणि रक्ताल्पता (ॲनिमिया) होऊ शकते. खाजेमुळे जनावरांची एकाग्रता कमी होते, ज्यामुळे त्यांच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. जूं नियंत्रणासाठी कीटकनाशक पावडर, स्प्रे किंवा पोर-ऑनचा वापर करावा. या उपायांनी जूंचा नाश होतो आणि त्यांच्या पुनरावृत्तीला आळा बसतो. स्वच्छता: जनावरांची नियमित निगा राखणे, स्वच्छता करणे, आणि नियमितपणे त्यांची तपासणी करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जनावरांच्या केसांचा योग्य प्रकारे धुवून स्वच्छता राखल्याने जूंमुळे होणारा त्रास कमी होतो. प्रभावित जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे ठेवल्याने या कीटकांचा प्रसार रोखता येतो.

माश्या : माश्यांमुळे जनावरांना त्रास होतो, ताण येतो, आणि मॅस्टिटिससारख्या रोगांचा प्रसार होऊ शकतो. माश्यांचे चावणे आणि त्यांच्या सततच्या उपस्थितिमुळे जनावरांना खूप त्रास होतो, ज्यामुळे त्यांच्या दुधाच्या उत्पादनावर नकारात्मक परिणाम होतो. माश्यांचे नियंत्रण करण्यासाठी कीटकनाशक स्प्रे, पोर-ऑन किंवा इअर टॅग्स वापरण्यात येतात. हे रसायने माश्यांच्या प्रजनन आणि वासस्थाने कमी करण्यासाठी प्रभावी आहेत. माश्यांच्या अळ्यांवर आक्रमण करणारे परजीवी कीटक यांचा वापर करून माश्यांची संख्या कमी करता येते.

पिसवा : पिसव्यांमुळे जनावरांना खाज, त्वचेची जळजळ आणि विविध रोगांचा प्रसार होऊ शकतो. पिसव्यांच्या चाव्यामुळे त्वचेवर खाज आणि जखम होऊ शकते, ज्यामुळे जनावरांना अत्यंत अस्वस्थता येते पिसव्यांचे नियंत्रण करण्यासाठी पिसू पावडर, स्प्रे किंवा डिप्सचा वापर केला जातो. हे रसायन पिसव्यांचा नाश करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. जनावरांच्या राहण्याच्या ठिकाणांची नियमित साफसफाई आणि निर्जंतुकीकरण केल्याने पिसव्यांची संख्या कमी करता येते. जनावरांच्या बिछान्याची देखील स्वच्छता करणे गरजेचे आहे. पिसवांच्या अळ्या आणि अंड्यांचा नाश करण्यासाठी वातावरणाचे उपचार करा. हे उपचार पिसवांच्या पुनरावृत्तीला रोखण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### लोकशाही दिन, सद्भावना दिन
### जागतिक डास दिन
### भारतीय अक्षय ऊर्जा दिन

### महत्वाच्या घटना

१६६६ : शिवाजीराजांनी दख्खनेमधे येण्यासाठी 'नरवीर घाटी' हे ठाणे खोटे दस्तऐवज दाखवून ओलांडले.

१८२८ : राजा राम मोहन रॉय यांनी महाराजा द्वारकानाथ टागोर (ठाकूर), कालिनाथ रॉय आणि मथुरानाथ मलिक या तीन मित्रांच्या साहाय्याने कोलकाता यथे ब्राम्हो सभेची स्थापना केली. या सभेलाच पुढे 'ब्राम्हो समाज' म्हणू लागले.

१८९७ : सर रोनाल्ड रॉस यांनी (भारतात) हिवतापाच्या जीवाणूचा शोध लावला. आल्मोडा येथे मलेरियावर केलेल्या संशोधनासाठी त्यांना १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार देण्यात आला.

१९१४ : पहिले महायुद्ध जर्मन फौजांनी ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.

१९२० : डेट्रॉइट, मिशिगन येथे जगातील पहिले व्यावसायिक नभोवाणी केंद्र ८ (सध्याचे ) सुरू झाले.

१९४१ : दुसरे महायुद्ध फ्रान्समधील भुमिगत चळवळ उखडून काढण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार नागरिकांना अटक केली. यातल्या ज्यूंना छळ छावण्यात रवाना करण्यात आले.

१९६० : सेनेगलने आपण (मालीपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.

१९८८ : इराण इराक युद्ध सुमारे ८ वर्षांच्या युद्धानंतर युद्धबंदी करार झाला.

२००८ : भारताचा कुस्तीगीर सुशीलकुमार याला बिंजिंग ऑलिंपिकमध्ये ब्राँझ पदक मिळाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७९ : जेकब बर्झेलिअस स्वीडीश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ७ ऑगस्ट १८४८)

१८३३ : बेंजामिन हॅरिसन अमेरिकेचे वे३३ राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १३ मार्च १९०१)

१८९६ : भारतीय फुटबॉल खेळाडू गोस्त पाल यांचा जन्म. (मृत्यू: ८ एप्रिल १९७६)

१९१५ : भारतीय राजकारणी व दक्षिण भारतातील कर्नाटक राज्याचे आठवे मुख्यमंत्री डी. देवराज उर्स यांचा जन्मदिन.

१९१७ : पुरोगामी कवितांचे प्रसिद्ध कवी त्रिलोचन शास्त्री यांचा जन्मदिन.

१९४० : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, शांततेचा नोबल पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हवामान बदलांच्या आंतर-सरकारी पॅनेलचे अध्यक्ष राजेंद्र कुमार पचौरी यांचा जन्मदिन.

१९४१ : स्लोबोदान मिलोसोव्हिच सर्बिया व युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष (मृत्यू: ११ मार्च २००६)

१९४४ : राजीव गांधी भारताचे ६ वे पंतप्रधान, भारतरत्न (१९९१) मरणोत्तर (मृत्यू: २१ मे १९९१)

१९४६ : एन. आर. नारायण मूर्ती 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक

१९८६ : अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय बुद्धिबळपटू तानिया सचदेव यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१४ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित उडिया भाषेचे प्रसिद्ध साहित्यकार गोपीनाथ महंती यांचा जन्मदिन.

१९३९ : भारतीय इंग्रजी खगोलशास्त्रज्ञ व लेखक एग्नेस गिबर्न यांचे निधन. (जन्म: १९ नोव्हेंबर १८४५)

१९८४ : रघुवीर भोपळे ऊर्फ 'जादूगार रघुवीर' आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार. त्यांनी ‘फिरता जादूगार‘ व ‘मी पाहिलेला रशिया‘ ही पुस्तके लिहिली आहेत. (जन्म: २४ मे १९२४)

१९८५ : अकाली दलाचे अध्यक्ष हरचंदसिंग लोंगोवाल यांची शेरपूर येथे एका गुरूद्वारात गोळ्या घालुन हत्या करण्यात आली. (जन्म: २ जानेवारी १९३२)

१९८८ : माधवराव शिंदे चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व संकलक. 'कन्यादान', 'धर्मकन्या' या त्यांच्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले तर 'शिकलेली बायको' या चित्रपटाला दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. याशिवाय त्यांचे मायेचा पाझर, संसार उर्मिला मातोंडकरचा पहिला चित्रपट हे चित्रपट प्रसिद्ध आहेत. (जन्म:)

१९८८ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व संकलक माधवराव शिंदे यांचे निधन.

१९९७ : प्रागजी डोस्सा गुजराथी नाटककार व लेखक, नेहरू पुरस्कार व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (जन्म: ७ आक्टोबर १९०७)

२००० : प्राणलाल मेहता चित्रपट निर्माते (किनारा, किताब, बेजुबान, मरते दम तक, पुलिस पब्लिक) (जन्म:)

२००१ : मधुकर रामराव तथा एम. आर. यार्दी प्राच्यविद्येचे गाढे अभ्यासक, केंद्रीय वित्त सचिव, भारतीय विद्या भवनच्या पुणे केंद्राचे अध्यक्ष (जन्म:)

२०११ : भारतीय इतिहासकार आणि शैक्षणिक राम शरण शर्मा यांचे निधन. (जन्म: २६ नोव्हेंबर १९१९)

२०१३ : जयंत साळगावकर ज्योतिर्भास्कर, लेखक व उद्योजक (जन्म: १ फेब्रुवारी १९२९)

२०१३ : अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक, थोर समाजवादी विचारवंत व साधना साप्ताहिकाचे संपादक डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांची पुणे येथे गोळ्या घालुन हत्या (जन्म:)

२०१४ : भारतीय योग प्रशिक्षक व लेखक तसेच आयंगर योगा चे निर्माते बी. के. अय्यंगार यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १९१८)

## थोडक्यात



### बंजारा समाजाची संस्कृती जपून ठेवावी-योगानंद महाराज

मंठा : मंठा तालुक्यातील टोकवाडी पश्चिम तांडा येथे संत श्री सेवालाल महाराज कार्यक्रम संपन्न झाला.. या कार्यक्रमाला तपस्वी योगी श्री योगानंद महाराज यांनी बंजारा समाजातील संस्कृती जपून ठेवा, लग्नात महिलानी डिजेवर नृत्य करु नये, व्यसनापासून दूर राहावे असा उपदेश केला. व्यसनापायी अनेक लोकांचे संसार उद्धवस्त झाले आहे, घरात सुख - शांती नांदत नाही, दारुच्या व्यसनामुळे दया, क्षमा, शांती घरात राहत नाही. आई वडीलांना घरातुन बाहेर काढून देतात.आपला धर्म सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे, धर्म सोडून दुसऱ्या धर्मामध्ये जाऊ नका असे परमपूज्य महाराजांनी यावेळी सांगितले.. मुला मुलींना शिक्षण, चांगले संस्कार द्यावे असे योगानंद महाराज म्हणाले.या कार्यक्रमाला हजारो संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. यावेळी भजनाचा कार्यक्रम तसेच पूजापाठ व आरतीनंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील बंजारा बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेची नितांत गरज`- मानवतकर

मंठा: १५ ऑगस्ट निमित्ताने घेण्यात आलेल्या तीन दिवसीय भाषण, संवाद, सूत्रसंचालन, नाट्य



अभिनय कार्यशाळा १८ ऑगस्ट रोजी प्रमुख अतिथी मार्गदर्शक एडवोकेट सुशील बनकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले तसेच कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांना एडवोकेट सुशील बनकर ,साहित्यिक डॉक्टर धोंडोपंत मानवतकर ,कार्यशाळा मार्गदर्शक नाट्य कलावंत सतीश खरात,पत्रकार मानसिंग प्रल्हादराव बोराडे,वगदे सर,यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले,उपस्थित महादेव पाखरे,निखिल रामपूरकर,व कार्यशाळेचे विद्यार्थी उपस्थित होते

### ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात रक्षाबंधन

धारूर : धरूर्षारतील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील स्काऊट व गाईड पथकातील बाल चिमुकल्या विद्यार्थ्यांनी किल्ले धारूर तालुक्यामध्ये कार्यरत असलेल्या १३६ बी इको भारतीय बटालियन सेना व पोलीस बांधव यांच्यासोबत रक्षाबंधन हा सण आनंदात साजरा केला. ज्ञानदीप विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जपवणूक व्हावी व विविध सण व उत्सव यांची ओळख व्हावी या हेतूने अनेक सण, उत्सव व जयंत्या साजऱ्या केल्या जातात त्यापैकीच आज रक्षाबंधनानिमित्त किल्ले धारूर तालुक्यातील पोलीस स्टेशनचे पोलीस बांधव व १३६ बी इको भारतीय बटालियन सेना या ठिकाणी जाऊन सामाजिक बांधिलकी जपत तेथील सर्व कर्मचाऱ्यांना रख्या बांधून रक्षा बंधन हा सण मोठ्या आनंदात साजरा केला.सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशन कामकाजबद्दल माहिती देत केले सविस्तर मार्गदर्शन केले या वेळी या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री देविदासजी वाघमोडे साहेब, सय्यदजी शाकेर, अनिल जी महाजन, शाहिद शेख,मुंजाराम निरडे सर पोलीस स्टेशन किल्ले धारूर व इको बटालियन १३६ बी सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



# ज्ञानराधाच्या आर्थिकबाणीचा वडवणीत पहिला बळी

## उपचाराला पैसे मिळाले नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा मृत्यू

वडवणी । प्रतिनिधी

जलसंपदा विभागात नौकरी करुन सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळालेल्या पेन्शनचे पैसे ज्ञानराधा बँकेत ठेवीच्या स्वरुपात ठेवले होते. परंतु अचानक प्रकृती ढासली आणि डॉक्टरानी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. यामध्ये ज्ञानराधा बँकेत आणि कुटे यांच्या कार्यालयाकडे वारंवार चकरा मारुन देखील ठेवीचे पैसे अदा न केल्यामुळे उपचाराला देखील पैसे मिळाले नसल्याने वडवणी येथील ६५ वर्षीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा अखेर आज पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला आहे.

वडवणी शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या परिसरातील रहिवाशी असणारे भगवान दत्तात्रय बारटक्के वय जवळपास ६५ वर्षीय हे जलसंपदा विभागात नौकरीला होते. गेल्या चार ते पाच वर्षापुर्वाच ते सेवानिवृत्त झाले होते. यानंतर सेवा बाजवल्या प्रकरणी शासनाकडून त्यांना पेन्शन मिळाली होती. त्यांनी वडवणी येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट बँकेत सन २०२२ साली तब्बल ७ लाखाचे फिक्स डिपाँझिट ठेवले असता काही दिवसातच त्यांची प्रकृती ढासळली यात डाँक्टराच्या तपासणी नंतर गंभीर आजाराचे निदान झाले होते. डाँक्टरांनी ऑपरेशनचा सल्ला दिला होता. यात ज्ञानराधा बँकेत एफडीच्या स्वरुपात ७ लाख रु. गुंतविले होते. तर काही दिवसातच बँकेचा बेजावरा उडाला बँक आर्थिक तोट्यात निघाली तर बँकेच्या सर्वेस्व असणारे सुरेश कुटेंनी पैसे देऊ कबुल केले होते यामध्ये काही महिने निघून गेल्यानंतर पोलीसांनी कुटेंना अटक केली आणि ठेवीच्या पैसे मिळतील या आशेवर पाणी फिरले आणि यामध्ये भगवान बारटक्के यांनी वारंवार चकरा आणि विनंत्या केल्या परंतु पैसे काही मिळाले नाहीत. यामध्ये त्याचा आज पहाटेच्या दरम्यान देवज्ञा झाली आहे. तर ज्ञानराधाचा आर्थिक आणीबाणीचा पहिला बळी वडवणी शहरात गेला असून त्यांच्या पश्चात दोन मुल, पत्नी, नातवंड सुना अशा परिवार असून.या बाबत आम्ही मयत भगवानराव बारटक्के यांच्या मुलांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले दोन वर्षांपूर्वी सेवा निवृत्ती ची जमा रक्कम ज्ञानराधा मल्टी स्टेट शाखा वडवणी च्या शाखेत जमा केली होती, परंतु मध्ये च आजार जोडल्याने डॉ ने बायपास सर्जरी करण्याचा सल्ला दिला होता परंतु पैसे नसल्यामुळे शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी अडचणी निर्माण होत होती.याबाबत बँकेशी वारंवार पैशाची मागणी करून बँकेने पैसे देण्यास असमर्थता दर्शवली परिणामी ज्ञानराधा मल्टी स्टेट बँकेच्या पैशा अभावी आमच्या वडीलांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले.



## पांढरेश्वर मंदिरामध्ये महाप्रसादाचे वाटप



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील पांढरेश्वर महादेव मंदिरामध्ये तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भाविक भक्तांसाठी भंडारा अर्थात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या पांढरेश्वर महादेव मंदिरामध्ये सालाबादप्रमाणे याही वर्षी तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भंडारा अर्थात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नामांकित कीर्तनकार बोधले महाराज यांचे सुश्राव्य किर्तन झाले.कीर्तनानंतर आलेल्या भाविक भक्तांसाठी महाप्रसादाच्या आयोजन करण्यातले होते यावेळी मोठ्या संख्येने गावकरी व भाविक भक्त उपस्थित होते.

## वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींना सुरक्षित रूम द्यावी-जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

कोलकत्ता येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेणारी डॉ. मौमिता नाईट ड्युटीवर असतांना तीच्यावर लैंगिक अत्याचार करून निर्घृणपणे खूण करण्यात आला.हा प्रकार मानव जातीला काळीमा फासणारा आहे.तेथे नाईट ड्युटीवर असणाऱ्या विद्यार्थ्यांनीसाठी आराम करण्यासाठी विशेष रूमची सोय नव्हती त्यामुळेच ही दुर्दैवी घटना घडली.या घटनेचे गांभीर्य पोलीस किंवा तेथील ममता सरकारला दिसून आले नाही.एवढे मोठे प्रकरण होऊनही वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्याने पोलीस खात्याला माहिती दिली नाही .यावरून प्राचार्य संवेदनशील नव्हते तसेच ममता सरकारनेही या प्रकरणी विशेष लक्ष दिले नाही असे म्हणावे लागेल.तेथील प्राचार्याने वैद्यकीय महाविद्यालयत सरकारच्या अशिर्वादाने गुंडाराज चालविले होते अशी मोठी चर्चा आहे. कोलकत्ता मधील वैद्यकीय महाविद्यालयात अनेक गैर प्रकार सुरू असल्याचे निष्पन्न होत आहे.जे विद्यार्थी विरोध करतील त्यांना गुंडा मार्फत चोप दिला जात होता तसेच परीक्षेत नापास केले जात होते.या मधील दोषीवर कठोर कार्यवाही करावी व देशाचे ग्रहमंत्री यांनी मृत डॉ.मौमिताला व तीच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा सामाजिक कार्यकर्ते एल.आर.जाधव यांनी केली आहे.

तेंव्हा महाराष्ट्रात अशी घटना घडू नये म्हणून सर्व शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालय पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलीसाठी नाईट ड्यूटी असेल तर आराम करण्यासाठी सुरक्षित विशेष रूम आवश्यक आहे.वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चोवीस तास किंवा छत्तीस तास ड्युटी असते.विद्यार्थ्यांना सलग एवढी मोठी ड्युटी देणे अन्यायकारक आहे.त्यामुळे बरेचसे विद्यार्थी ताणतणावात असतात.महाराष्ट्रातही वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागते.मागील काही काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत परंतु त्याच्या खोलात कोणी गेले नाही.बरेचसे प्रकरणे दडपले गेल्याचा संशय येऊ शकतो.नाईट ड्युटीवर असणाऱ्या डॉ.मुलींसाठी सध्या तरी महाराष्ट्रात आराम करण्यासाठी कायमस्वरूपी विशेष रूमची आवश्यकता आहे. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री ,वैद्यकीय शिक्षणमंत्री यांनी सर्व शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयतील प्राचार्यांना आदेश काढुन वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलीच्या सुरक्षितते बाबत आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी सेवानिवृत्त मुख्याध्यापक एल.आर.जाधव यांनी केली आहे.

## अध्यक्षपदी अक्षय राऊत तर सचिवपदी धनंजय रेपे

धारूर । प्रतिनिधी

शिवगर्जना गणेश मंडळ आयोजित गणेशोत्सव २०२४ साजरा करण्यासाठी दिनांक १७ ऑगस्ट रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीमध्ये गणेश उत्सवासाठी कार्यकारणी निवडण्यात आली मंडळाच्या अध्यक्षपदी अक्षय राऊत तर उपाध्यक्षपदी निलेश शिनगारे सचिव धनजय रेपे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तसेच मंडळाच्या सहसचिव पदी सोमनाथ शिनगारे, कोष अध्यक्ष जनक फूंने प्रसिद्धीप्रमुख विश्वास शिनगारे, प्रतीक लांडगे सुधीर शिनगारे, विठ्ठल शिनगारे, विनायक शिनगारे, सदिच्छा तुकाराम शिनगारे,यांची निवड करण्यात आली यावेळी उपस्थित राजेश शिनगारे,अजित शिनगारे, विशाल करुंद कृष्णा शिनगारे निलेश शिनगारे अमोल राऊत सचिन शिंगारे गणेश थोरात आदिनाथ शिनगारे वैभव शिनगारे मोठ्या संख्येने गणेश भक्त बैठकीत उपस्थित होते याही वर्षी समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे यावेळी ठेवण्यात आले.

## ब्रह्माकुमारी येथे रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरे

माजलगाव । प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा-माजलगाव येथे दि.१८ ऑगस्ट रविवार रोजी रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी दीप प्रज्वलन करून झाली.याप्रसंगी प्रज्ञा दीदी बोलताना म्हणाल्या पाच विकारापासून आत्मरक्षण करणे हेच खरे रक्षाबंधन आहे.त्याचबरोबर उपस्थितांना राजयोग मेडिटेशनची अनुभूती करून घेतली आणि सर्वांना सात दिवसांचा मोफत संस्थेचा कोर्स करण्यासाठी आवाहन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जयसिंग सोळंके या



ओम शांती केंद्रासारखी शांती मी कुठेही अनुभवली नाही. प्रत्येकाने आपल्या जीवनात आनंद, प्रेम,आणि शांतीची गरज आहे.प्रमुख पाहुणे उपनिरीक्षक दिंडे म्हणाले मी यापूर्वी अध्यात्मिक कार्य करत होतो आणि आजही ड्युटी करून अध्यात्म सोडले नाही जीवनात माणसाला अध्यात्माची गरज आहे.प्रमुख उपस्थिती सखाराम तौर,माजी नगरसेवक विजय शिंदे,महेश सावध, आदर्श गुरुकुल संचालक केशव बादाडे हे होते. सूत्रसंचालन मोतीराम बासटवार व बालाजी बचाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार माजलगाव सेवा केंद्र संचालिका अनिता दिदी यांनी मानले. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक शिक्षक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्षपदी सचिन रानडे तर उपाध्यक्षपदी शिवाजी पोकळे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनची नुकतीच बैठक संपन्न झाली यावर आधुनिक फोटोग्राफी तसेच विविध विषयांवर साधक बाधक चर्चा झाल्यानंतर फोटोग्राफर संघटनेची कार्यकारिणी देखील याच बैठकीत जाहीर करण्यात आली यामध्ये आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर सचिन रानडे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी तर शिवाजी पोकळे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली रामकृष्ण औटे हे सचिव अशपाक बेग कोषाध्यक्ष व स्वप्निल धस खजिनदार म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

फोटोग्राफर बांधवांच्या असणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाययोजना राबविण्यासंबंधी विविध चर्चासत्र या बैठकीमध्ये संपन्न झाले. गेल्या अनेक वर्षापासून विस्कळीत



झालेली फोटोग्राफर्स असोसिएशनची कार्यकारणीची घडी पुन्हा एकदा बसवण्याचे काम या निमित्ताने या बैठकीत पार पडले. यावेळी सर्वानुमते खालील कार्यकारणी जाहीर करण्यात आली. आष्टी तालुका फोटोग्राफर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी सचिन रानडे उपाध्यक्षपदी शिवा पोकळे सचिव म्हणून रामकृष्ण औटे कोषाध्यक्ष म्हणून अशपाक बेग खजिनदार म्हणून स्वप्निल धस यांची निवड करण्यात आली.त्यांच्या या निवडी बद्दल सर्वांनी अभिनंदन केले.


# वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य आयोजित दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

## अध्यक्षपदी प्रा.डॉ. संगीता गणपतराव घुगे तर उद्घाटकपदी प्रा.डॉ.गजानन सानप यांची निवड

परभणी । प्रतिनिधी

२५ ऑगस्ट २०२४ रोजी अहिल्यानगर येथील गंगा लॉन्स वर वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य आयोजित दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे.या संमेलनाच्या अध्यक्षपदी नांदेड येथील सुप्रसिद्ध कवयित्री तथा समीक्षक प्रा.डॉ.सौ.संगीता गणपतराव घुगे तर उदघाटकपदी छत्रपतीसंभाजीनगर येथील सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रा.डॉ.गजाननराव सानप यांची निवड झाली असून निवड समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांनी आज रोजी या निवडीची घोषणा एका पत्रांन्वये केलीय.

डॉ.संगीता घुगे यांनी यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे १९९८ पासून अध्यापनाचे कार्य केले असून सध्या त्या शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर जि. नांदेड येथे कार्यरत आहेत.समीक्षा आणि संशोधनात त्यांचे कार्य अधोरेखित व्हावे या उंचीचे आहे. शिवाय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा गौरव विविध संस्था संघटनांनी वेळोवेळी केलाय. नव्वदोत्तर कवयित्री म्हणूनही त्या ख्यातकीर्त आहेत. तर उदघाटक डॉ.गजानन सानप हे सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय छत्रपती



संभाजीनगर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मागील दहा वर्षांपासून पदवीधर गटातून सिनेट सदस्य म्हणून त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान त्यांनी दिलेय. शिवाय विद्यापीठ विकास मंच महाराष्ट्र राज्याचे सचिव म्हणूनही त्यांचे कार्य स्पृहणीय आहे. शिवाय विद्यापीठात स्वायत्त संस्था गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण संशोधन संस्थेचे ते संस्थापक आहेत.

सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची आजवरची वाटचाल अभिनंदनीय असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अठरापेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आस्था या सामाजिक संस्थेचे व स्वामी समर्थ अनाथ आश्रमाचे संस्थापक संचालक असून विविध पुरस्कारांचे ते मानकरी ठरले आहेत. संमेलनाध्यक्ष व उदघाटकांच्या निवडीचे वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक विचारवंत प्रबोधनकार श्री.गणेशजी खाडे यांचेसह नाशिक येथे संपन्न झालेल्या वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांनी अभिनंदन केले. स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार अघाव, सह-स्वागताध्यक्ष रेणुका वराडे, सह-स्वागताध्यक्ष घनश्याम बोडके, मल्हारी खेडकर हे संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.


### जाहीर प्रगटन
**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७
**जा.क्रं.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-१८६६ दिनांक:- १९/०८/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सुभाष अण्णासाहेब तौर रा. गुंज बु ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे १. शेख मोबीन शेख नुरोद्दीन २. शेख सलमान शेख मुन्ना रा. ता अंबड जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १५४४ दि. ०६/०५/२०१७ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२०३३) दिनांक. ०४/०७/२०२४ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. शेख मोबीन शेख नुरोद्दीन २. शेख सलमान शेख मुन्ना रा. ता अंबड जि. जालना नावावर असलेला गट नं. (१९६) सिटी सर्वे नं. मधील प्लॉट नं. ४१, ४२, ४३ चे प्रत्येकी एक प्लॉट क्षेत्र ७५.०० चौ.मी आसे एकुण २२५.०० चौ.मी जागा ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे. पुर्व :- रस्ता, पश्चिम :- प्लॉट नं. ३६,३७,३८, दक्षिण :- प्लॉट नं. ४०., उत्तर : प्लॉट नं. ४४ या वरील चतुःसिमा मधील प्लॉटचे क्षेत्र २२५.०० चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

### जाहीर प्रगटन
**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७
**जा.क्रं.२०२४/नपघ/जा.प्र./कावी- १६९४ दिनांक:- २३/०७/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रत्नेश्वर देवनाथ शेंडगे रा. देवहिवरा ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २२३८ दि. ०४/०८/२०१२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२२४१) दिनांक. २२/०७/२०२४ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं. (५८/३) सिटी सर्वे नं. मधील प्लॉट नं. ५१ चे क्षेत्र ७७.०० चौ.मी जागा ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. ५०, पश्चिम :- अंतर्गत रोड, दक्षिण :- अंतर्गत रोड, उत्तर : प्लॉट नं. ५२ या वरील चतुः सिमा मधील प्लॉटचे क्षेत्र ७७.०० चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

### जाहीर प्रगटन
**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७
**जा.क्रं. २०२४/नपघ/जा.प्र./कावी-१६९६ दिनांक:- २३/०७/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रविंद्र देवनाथ शेंडगे रा. देवहिवरा ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २२३९ दि. ०४/०८/२०१२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२२३९) दिनांक. २२/०७/२०२४ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं. (५८/३) सिटी सर्वे नं. मधील प्लॉट नं. ४९ चे क्षेत्र ७३.५० चौ.मी जागा ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- अंतर्गत रोड, पश्चिम :- प्लॉट नं. ५२, दक्षिण :- प्लॉट नं. ५०, उत्तर : प्लॉट नं. ४८ या वरील चतुः सिमा मधील प्लॉटचे क्षेत्र ७३.५० चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

### जाहीर प्रगटन
**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH. No. ०२४८३-२७१७८७
**जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-१६९५ दिनांक:- २३/०७/२०२४**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार राजेश्वर देवनाथ शेंडगे रा. देवहिवरा ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २२४० दि. ०४/०८/२०१२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२२४०) दिनांक. २२/०७/२०२४ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. महाविर अमरचंद डुंगरवाल रा. ता घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं. (५८/३) सिटी सर्वे नं. मधील प्लॉट नं. ५० चे क्षेत्र ७७.०० चौ.मी जागा ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- अंतर्गत रोड, पश्चिम :- प्लॉट नं. ५१, दक्षिण :- अंतर्गत रोड, उत्तर : प्लॉट नं. ४९ या वरील चतुः सिमा मधील प्लॉटचे क्षेत्र ७७.०० चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसावंगी

# केज तालुक्यात शेतात काम करीत असलेल्या महिलेचा विनयभंग

## दीड महिन्यापासून करीत होता पाठलाग : पीडितेला गावातून हाकलून देण्याची दिली होती धमकी!

**नांदूरघाट । प्रतिनिधी**

शेतात सोयाबीनच्या पिकातील तण काढीत असलेल्या अनुसूचित जातीच्या विवाहित महिलेचा गावातील एका नराधमाने विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. १७ ऑगस्ट रोजी केज तालुक्यातील एका गावात एक अनुसूचित जातीची महिला व तिची भावजय या दोघी सोयाबीनच्या पिकातील तण काढीत होत्याा. त्याावेळी दुपारी २:१५ वा. आनंद सुधाकर कातमांडे हा शेतात तिच्या पाठी मागून जाऊन तिच्याशी झोंबाझोंबी केली. व तिच्याशी ओढाओढी करून तिला खाली पडले आणि विनयभंग केला. तसेच ती त्याालाा आवडते असे सांगून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. त्याा महिलेने आरडाओरड केल्या नंतर तिची भावजय आली. पीडित महिलेची त्यााच्या पासून सुटका करीत असताना आनंद कातमांडे याने तिला शिवीगाळ करून चापटाने मारहाण केली. आणि खोटा गुन्हा दाखल करून जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकारामुळे पीडित महिला घाबरून गेली होती. तसेच तिचे पती व वडील घरी नव्हते. दि.१९ ऑगस्ट रोजी पीडित महिलेच्या तक्रारी वरून आनंद कातमांडे यांच्या विरुद्ध केज पोलिसात गु. र. नं. ४५९/२०२४ भा. न्या. सं. ७४, ७५, ७६, ७८, ७९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक आनंद शिंदे हे तपास करीत आहेत.

### दीड महिन्यापासून करीत होता पीडितेचा पाठलाग

सुधाकर कातमांडे हा मागील एक ते दिड महीण्या पासुन ती विवाहित रस्त्याने ये-जा करताना आणि शेताकडे जाताना तिच्या मागे-पुढे चालुन पाठलाग करून हातवारे व इशारे करुन जवळीक साधण्याचा प्रयत करीत होता. परंतु पिडितेने त्याला वांरवार विरोध केला असता. जिवे मारण्याच्या व गावातून हाकलुन देण्याची धमकी देत होता.

### इज्जतीच्या भीतीने पिडीतेने केली नाही तक्रार

पीडितेच्या सासर व माहेर एकाच गावात असल्याने गावात व सर्वात इज्जत जाईल. म्हणून तिने याची वाच्यात केली नव्हती; परंतु त्याने नंतर तिला जास्त त्रास द्यायला सुरुवात केली. म्हणून तिने ही माहिती नवरा व वडिलांना दोघांना दिली. त्यांनी त्याला समज देखील दिली होती.

# चिंचाळ्यात मंदिराची दानपेटी फोडणारा चोरटा रंगेहाथ पकडला

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचाळा परिसरातील एका मंदिराचे कुलूप तोडून दानपेटी फोडण्याचा प्रयत करणा-या गणेश दत्तू कांबळे (रा. देसूर ता. आष्टी) या चोरट्यास ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले. काल (ता. १७) रात्री अकराच्या सुमारास हा प्रकार घडला.

याबाबत दिलीप बाळू पोकळे (वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती रा. चिंचाळा ता. आष्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचाळा-देसूर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असून, या भागातील खटकळी परिसरात बाबासाहेब देवस्थान परिसरात डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. आहे. बाबासाहेब देवस्थान मंदिरामध्ये काहीतरी ठोकल्याचा मोठ्याने आवाज येत आहे. असे रस्त्याचे काम करणारे अनिल सतीश पोकळे यांनी फिर्यादीला ता. १६ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास फोन करून सांगितले.

त्यानुसार फिर्यादी हे आपले सहकारी शरद पोथीराम पोकळे, जानदेव नवनाथ साळुंके, सुरेश एकनाथ



### दोन-तीन वेळा घडले चोरीचे प्रकार

**दरम्यान, चिंचाळा येथे बाबासाहेब देवस्थानमध्ये महादेव मंदीर असून यामध्ये विठ्ठल-रुख्मिनी मंदीर, श्रीसंत वामनभाऊ, श्रीसंत यादवबाबा यांच्या मूर्ती आहेत. काही दिवसांपूर्वी भाविकांनी अर्पण केलेल्या घंटा, पितळाच्या समया, अर्पण करण्यात आलेले नवसाचे चांदीचे घोडे असा ऐवजाची चोरी झाली आहे. तसेच एका वेळेस दानपेटी फोडून त्यातील रक्कम लंपास करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणांचा उलगडा पोलिस तपासात करण्यात यावा, अशी मागणी परिसरातील भाविकांमधून होत आहे.**

# पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी -जाधव

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा. व परिसरात गेल्या काही दिवसांपासून सततच होत असलेला पाऊस आणि शुक्रवारी रात्री आष्टेगाव पुट्टा भागासह साकत कडबनवाडी कोल्हेवाडी कवडवाडी महासांगवी शिवारात मुसळधार पाऊस झाल्याने नदीकाठातील पाटोदा व इतर मांजरा नदीकाठावरील पाटोदा,नफरवाडी, पारगाव,या ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी अतिवृष्टीमुळे नदीला आलेल्या महापुरामुळे उभे पीक पाण्याखाली गेले व काही पीक वाहून गेल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या नुकसान झाल्याने त्याच बरोबर उभे पीक पाण्याखाली गेले व काही पीक वाहून गेल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या कधी न भरणारे नुकसान झाल्याने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्राकाद्वारे मागणी केली आहे.



शुक्रवारी मध्यरात्री पाटोदा महसूल मंडळात तीन तासात ७१.५ मिलिमीटर पाऊस झाल्याने अतिवृष्टीमुळे महासांगवी तलावातील माजरा नदीत १० हजार ५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. नदी शेजारील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साठल्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून जिल्हाधिकारी साहेब यांनी तालुका प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी असे प्रसिद्धीपत्राकाद्वारे राहुल जाधव यांनी केली आहे.



**पिंपळवंडी : बहिण-भावांचा,पवित्र नात्याचा व अखंड प्रेमाचा सण म्हणून राखी पौर्णिमा अनादी काळापासून साजरी केली जाते.कु.धनश्री,कु.यशश्री व कु.राजश्री उकांडे या चिमुकल्या बहिणी आपल्या छोट्या भावाला ओवाळून त्याच्या हाताला राखी बांधून बहीण-भावाचे अतूट,प्रेम व्यक्त करतांना छायाचित्र दिसत आहे.**

# बन्सोडे, जाधव यांची मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या कार्यकारिणीवर निवड

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सची बैठक रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. या बैठकीत नुतन कार्यकारिणी सदस्यपदी बीड येथील राजेंद्र बन्सोडे व भास्करराव जाधव यांची निवड करण्यात आली.





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी उपाध्यक्ष सत्यानारायण लाहोटी, महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, मराठवाडा अध्यक्ष आदेशपाल छाबडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. यामध्ये मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स अध्यक्षपदी आदेशपाल छाबडा यांची फेर निवड करण्यात आली. तर वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून सुरेंद्र रेदासनी, सचिव पदी जफर मिर्झा यांची निवड करण्यात आली.

तसेच मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स कार्यकारणीवर बीड मधून दोन सदस्याची निवड करण्यात आली. त्यामध्ये राजेंद्र बन्सोडे व भास्करराव जाधव यांचा समावेश आहे. यावेळी बीड जिल्ह्यातील प्रतिनिधी म्हणून बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, जिल्हाध्यक्ष भास्करराव जाधव, राजेंद्र बन्सोडे, सुरेंद्र रेदासणी, जफर मिर्झा,संतोष अब्बड ,गणेश लोहिया, प्रभाकर होके, सुनील भांडेकर, रामेश्वर टवाणी, लक्ष्मीनारायण मुंदडा, बंब इत्यादी व्यापारी बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गडावर श्रीकुंभेश्वर यात्रा महोत्सव उत्साहात

## श्रावण सोमवार; कुंभेश्वराच्या दर्शनासाठी मोठी गर्दी; मंदिर परिसर गजबजला

**तांदळा । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव ता.गेवराई येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षीही संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांच्या अध्यक्षतेखाली श्रावण सोमवारी श्री.कुंभेश्वर यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रा महोत्सवात पंचक्रोशीतील बंजारा समाजाच्या वतीने श्री कुंभेश्वरास गंगोदकाचा जलाभिषेक, परंपरेप्रमाणे बंजारा समाजाचे भजन यानंतर ह.भ.प.श्री. एकनाथ महाराज गाढे यांचे किर्तन संपन्न झाले. दरम्यान यावेळी कुंभेश्वराच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केल्याने मंदिर परिसर गजबजून गेला होता. यावेळी महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेवराई तालुक्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे महंत दत्ता महाराज गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते दरम्यान दि.१९ ऑगस्ट रोजी तिसऱ्या श्रावण सोमवारी श्री. कुंभेश्वर यात्रा महोत्सव निमित्ताने पंचक्रोशीतील संपूर्ण बंजारा समाजातर्फे श्री.कुंभेश्वरास गंगोदकाचा जलाभिषेक नंतर परंपरेप्रमाणे पंचक्रोशीतील बंजारा समाज बांधवांच्या वतीने बंजारा समाज यांच्या वतीने भजन झाले. यानंतर ह.भ.प. लक्ष्मण महाराज पवार व ह.भ.प. बळीराम महाराज राठोड यांचे सोमवार १० ते १२ या वेळेत बंजारा हरिकिर्तन होईल व नंतर महाराष्ट्रातील सुप्रसिध्द रामायनाचार्य ह.भ.प.श्री. एकनाथ महाराज ◀◀ पान ३ वर

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे शनिवारी आयोजन

## बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे -राजकिशोर मोदी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरा पुरतीच मर्यादित न राहिलेल्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन शनिवार दि २४ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे .

मागच्या सत्तावीस वर्षापूर्वी अंबाजोगाई शहराची आर्थिक गरज लक्षात घेवून केवळ शहरासाठीच राजकिशोर मोदी व त्यांच्या काही निवडक सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची सुरुवात केली होती. मात्र आज ही बँक आपल्या आर्थिक बळाच्या जोरावर १८ शाखेच्या माध्यमातून मोठ्या डौलाने व दिमाखात नागरिकांना सेवा देत कार्यरत आहे . आज केवळ अंबाजोगाई शाखेत ३५ हजाराच्या वर ग्राहक आहेत. तर बँकेच्या सर्व शाखांचे मिळून एक लाखाच्या वर ग्राहक आहेत . हे सर्व ग्राहक बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यावर विश्वास ठेवून आपली जमापुंजी बँकेत जमा करताना दिसून येत आहेत . बँकेच्या वतीने हजारो गरजुवंत सुशिक्षित बेरोजगार , लहानमोठे व्यापारी, हातगाडी व फेरीवाले अश्यांना त्यांचा व आपल्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कर्जाच्या ◀◀ पान ३ वर

# मानवी जीवन सुखी करण्यासाठी बौद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही. - पू.भिक्खु धम्मशील थेरो

**माजलगाव । प्रतिनिधी**

आपण व्रतवैकल्ये कर्मकांडातून मुक्त झाल्याशिवाय बौद्ध धम्माची त्या धारण करू शकणार नाहीत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्मातील अगाध साहित्या आपणास वाचणे शक्य होणार नाही म्हणून द बुद्ध अँड हिज धम्मा हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ लिहिला आणि जगाला धम्माची ओळख करून दिली. तसेच भारतातील कर्मकांडग्रस्त बांधवांसाठी २२ धम्म प्रतिज्ञा दिल्या.

प्रसेनजित राजाच्या कार्यकाळात डाकू अंगुलीमालाच्या दहशितीने प्रजा भयभीत झाली होती. हत्ती घोडे शस्त्र हजारो सैन्य असूनही राजा हतबल झाला होता. परंतु भगवान बुद्धाच्या करुणा मैत्रि बलापुढे क्रूर अंगुलीमाल भगवान बुद्धाला शरण गेला.

व भिक्खु झाला व भगवान बुद्धा च्या उपदेशाने तो दुःख मुक्त झाला.तो दिवस म्हणजे ''श्रावण पौर्णिमा ''.

बौद्ध धम्माच्या आचरणाने डाकू असलेला अंगुलीमाल हा पुढे अर्हत भिक्खु होऊन सुखी जीवन जगू लागला. शील हा उपासकाचा दुसरा सद्गुण आहे. शील हे धन आहे. माणूस माणसाचा सन्मान त्याच्या सदाचारामुळे करतात. धनसंपत्तीपेक्षा माणसाच्या चारित्र्याला, शिलाला ,सदाचाराला महत्त्व आहे. धम्मात याच बाबीला अधिक महत्त्व दिले आहे. म्हणून मानवी जीवन सुखी करण्यासाठी बौद्ध धम्माशिवाय पर्याय नाही. असे प्रतिपादन पूजनीय भिक्खु धम्मशील थेरो यांनी व्यक्त केले.



राज्याचा तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या सद्? धम्म सेवा संघाच्या श्रावस्ती बुद्ध विहारात आज दि.१९/८/२०२४ वार. सोमवार रोजी वर्षावासानिमित्त श्रावण पौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव चे उपविभागीय अधिकारी मा.गौरवजी इंगोले हे उपस्थित होते.या पूजेचे यजमान आयु.भास्करराव घाडगे व महानंदा भास्करराव घाडगे यांनी उपस्थितांना मिष्टांन्नयुक्त भोजनदान दिले.सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष आयु सदाशिव भालेराव यांनी केले. तर सूत्रसंचालन अ‍ॅड. दशरथ मकसरे यांनी केले.

तर आभार सचिव जी.एन घनघाव यांनी मानले.या वेळी सद्? धम्म सेवा संघाचे भगवानराव सातपुते,नवनाथ शिनगारे, पांडुरंग जाधव, सोपान उजगरे, ◀◀ पान ३ वर

# श्री योगेश्वरी देवल कमेटीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर भाविकानी व्यक्त केले समाधान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत माता श्री योगेश्वरी देवीच्या देवल कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती नुकतीच दि १ जुलै २०२४ रोजी शासकीय नियमानुसार धर्मादाय आयुक्त बीड यांनी जाहीर केली आहे.

जाहीर झालेल्या नवीन विश्वस्त मंडळाची बैठक पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत नवीन कार्यकारिणी ची निवड करण्यात आली. यामध्ये अनुक्रमे उपाध्यक्ष पदी राजकिशोर कांताप्रसाद मोदी, सचिव म्हणून प्रा अशोक लोमटे, सहसचिव संजय भोसले, कोशाध्यक्ष शिरीष पांडे, यांची निवड करण्यात आली.

नवीन विश्वस्त मंडळ स्थापन झाल्यापासून पंधराच दिवसांनी श्री



योगेश्वरी देवीच्या महाआरतीनंतर म्हणजेच दुपारी १२ ते २ या कालावधीत (अन्नदान) महाप्रसादाचे आयोजन देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. यामुळे बाहेरून येणाऱ्या भाविकांची मोठी सोय होऊन त्यांना महाप्रसादाचा लाभ मिळत आहे. देवीच्या दर्शनासाठी आलेला भक्त दर्शनानंतर महाप्रसाद घेऊन समाधान व्यक्त करतांना दिसून आला. या महाप्रसादाचा लाभ प्रतिदिन ते३००४०० भाविक घेत असून यापुढेही महाप्रसादाचा हा उपक्रम असाच अखंडित सुरू ठेवून त्याची वेळ वाढविण्यासाठी नवीन विश्वस्त मंडळ प्रयत करणार आहे. नूतन कमिटीने मंदिर स्वच्छतेबाबत देखील मोठा निर्णय घेऊन दिवसातून चार वेळा मंदिर व परिसराची स्वच्छता केल्या जात आहे. वीज व वीजबिल टाळण्यासाठी २० किलो व्याट ची सोलार बॅटरी बसवून मंदिराची दरमहा वीजबिलातून मुक्तता करण्यात यश मिळवले. मंदिर प्रशासनाचे रेकॉर्ड अद्यावत करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळा कडून २कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला त्या निधीतून धर्मशाळा, पालखी मार्ग, व पार्किंग व्यवस्था सुसज्ज ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ओतूरला जोरदार पावसाच्या पाण्यात भाज्या वाहून गेल्या

## दीड तास कोसळलेल्या या पावसाने यात्रेकरूंची त्रेधा उडवून दिली

पुणे । प्रतिनिधी

ओतूर (ता. जुन्नर) येथे आज श्रावणी सोमवारी(दि.१९) जोरदार पाऊस कोसळला. रस्त्यांवरून वाहिलेल्या पुर सदृश्य वेगवान पावसाच्या पाण्याने अनेक भाजी विक्रेत्यांच्या सर्व प्रकारच्या भाज्या वाहून जाऊन अतोनात नुकसान झाले आहे.सुमारे दीड तास कोसळलेल्या या पावसाने यात्रेकरूंची त्रेधा उडवून दिली.यात्रेतील खेळणी,मिठाई विक्रेते,आकाशी पाळणे अशा सर्व प्रकारच्या व्यावसायिकांचे संपूर्ण व्यावहार ठप्प होऊन त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.तसेच स्थानिक दुकानांमध्ये पाण्याचा प्रवाह घुसून दुकानातील मालांचे नुकसान झाले आहे.



ओतूर गावठाणात काँक्रीटीकरण केलेले रस्ते हे विना अभ्यास केल्यामुळे व सांडपाण्याच्या गटारीतील पाणी वाहून नेणारे पाईप हे कमी क्षमतेचे असल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यांवर पूरसदृश्य परिस्थिती निर्माण करीत आहे अशी नागरिकांची तक्रार आहे. मोठा पाऊस झाल्यावर त्याचे परिणाम नागरिकांना सोसावे लागत असून नुकसान झाल्यामुळे दर वर्षी ग्रामस्थांना आर्थिक फटका बसू लागला आहे.ग्रामपंचायत प्रशासनाने याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

# ऐसा रंगला सोहळा !

## माऊलींसाठी आली मुक्ताईची राखी...

पुणे । प्रतिनिधी

संत मुक्ताईच्या वतीने भाऊ संत ज्ञानेदेवांसाठी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानकडे राखी अर्पणझींवहरीळ

एक आपण साधू झाले । येर कोण वाया गेले ।।१।।

उठे विकार ब्रम्ही मुळ । अवघे मायेचे गाबाळ ।।धृ।।

माया समुळ नुरे जेव्हा । विश्व ब्रम्ह होईल तेव्हा ।।३।।

सा उमज आदि अंती । मग सुखी व्हावे संती ।।४।।

काम क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।

असे सांगत तत्कालीन समाजाकडून झालेल्या त्रासाला कंटाळून निराश होत झोपडी बंद करून बसणाऱ्या ज्ञानदेवांना उपदेश करत निराशेच्या गर्तेतून बाहेर काढणाऱ्या मुक्ताईमुळेच ज्ञानदेव संत झाले ! आणि त्यांनी जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले.अशा या लहानग्या मुक्ताईचे भगिनी प्रेम पुन्हा जागविण्याचे काम संत. मुक्ताबाई संस्थान, मुक्ताई नगर यांनी केले आहे.



या संस्थानकडून संत मुक्ताईच्या वतीने भाऊ संत ज्ञानेदेवांसाठी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानकडे राखी अर्पण करण्यात आली. बहीण भावाच्या या गोड प्रेमाची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. इंद्रायणी नदीच्या घाटांनी,सिद्धेश्वराच्या कळसाने,सुवर्ण पिंपळाच्या पानांनी,देऊळ वाड्याने आणि अवघ्या अलंकापुरीने शेकडो वर्षांनंतर हे प्रेम अप्रत्यक्ष रित्या अनुभवले असेच म्हणावे लागेल. पहाटे नित्य पूजा व पवमान अभिषेक झाल्यानंतर सकाळी माऊलींना राखी अर्पण करण्यात आली.

**इंद्रायणीने अनुभवला बहीण भावाच्या प्रेमाचा क्षण**

आदिशक्ती मुक्ताई संस्थान, मुक्ताई नगर यांच्या वतीने देवस्थानचे विश्वस्त संदीप पाटील, रविंद्र पाटील व अंकीता पाटील यांच्या हस्ते माऊलींच्या समाधीवर राखी अर्पण करण्यात आली. यावेळी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजननाथ यांच्या हस्ते श्री संत ज्ञानेश्वर माऊलीं तर्फे मुक्ताबाईला साडी चोळी भेट म्हणून देण्यात आली. यावेळी प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते.ज्ञानदेवांप्रमाणे निवृत्ती नाथ महाराज,सोपान काका महाराज यांनाही राख्या पाठविण्यात आल्या.

# शहरात डेंग्यूचे ८२, चिकनगुनियाचे १० तर झिकाचे ५ रुग्ण

पिंपरी–चिंचवड महापालिका (झळाीिळ)कार्यक्षेत्रात डेंग्यू आजाराचे ८२ रुग्ण, चिकुनगुनिया आजाराचे १० रुग्ण व झिका आजाराचे ५ रुग्ण आढळुन आलेले आहेत. या रुग्णांपैकी ३रुग्ण गर्भवती महिला आहे. तीनही रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना घरी सोडण्यात आलेले आहे.

गर्भवती महिलांना झिका व डेंग्यू या आजाराची कोणतीही लक्षणे आढळून आल्यास जसे की, ताप, सांधेदुखी, डोळयांच्या मागे दुखणे त्यांनी त्वरीत डॉक्टरांचा सल्ला व वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. डेंग्यू,




चिकुनगुण्या व झिका आजारांच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय विभागामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. प्रत्येक आठवडा एक दिवस एक तास या मोहिमेअंतर्गत रविवारी शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपापल्या घरी साफसफाई व डासोत्पत्ती स्थानके नष्ट करण्याची कार्यवाही केली.

# वाहने फोडणाऱ्या सराईत गुंडाची सांगवी पोलिसांनी काढली धिंड

पुणे । प्रतिनिधी

दारू पिऊन रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांची सराईत गुंडाने तोडफोड केली. त्या सराईत गुंडाची सोमवारी (दि. १९) दुपारी (झपर्सीळ )पिंपळे गुरव परिसरातून सांगवी पोलिसांनी धिंड काढली. अक्षय राजेश खुडे (वय २७, रा. राजीव गांधी नगर, पिंपळे गुरव) असे धिंड काढलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अक्षय खुडे याने शुक्रवारी (दि. १६) दुपारी रस्त्यावर पार्क केलेल्या चार वाहनांची तोडफोड केली. तसेच, मी अक्षय खुडे आहे, मी इथला भाई आहे असे मोठमोठ्याने ओरडून एका महिलेच्या दिशेने दगड फेकून मारला. नियंत्रण कक्षाकडून माहिती



मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, पोलिसांनी मघटनास्थळ पाहणी करण्याच्या बहाण्याने आरोपीला घटनास्थळी चालवत नेले. अशा प्रकारे पोलिसांनी आरोपीची धिंड काढल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# माजी सैनिकांसोबत रक्षाबंधन

पुणे । प्रतिनिधी

आकुर्डीतील स्टेप्स फाउंडेशनच्या वतीने (–ज्ञींवळ )माजी सैनिकांसोबत रक्षाबंधन साजरे करण्यात आले. तसेच १३५० वृक्षांचे देहू आणि आळंदी परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी कारगील योद्धा रामदास मदने, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. संदेश मुखेडकर, रोटरी क्लबचे पिंपरी सचिव संदीप पोलकम, मोरया अकॅडमीचे संस्थापक प्रा.नितीन साळी, संजीवनी डिंबळे, अश्विन गुडसुरकर, अजिंक्य जाधव, ज्ञानसागर स्कूलचे प्रमुख प्रदीप रॉय, नीलम गुप्ता, नरेश सोंडकर, संदीप मिश्रा, डॉ. अमित बेलोकर, डॉ. संतोष पाचपुते, लीतेश घरडे, कमलजीत सिंह,



भक्ती मुखेडकर, संदीप मोरे, अभिषेक कुंटुरकर, दीपाली नारगुंडे, दुर्गेश पुराणिक, व्यंकटेश सोमवंशी, मनोज दराडे, ऋषिकेश गुडसुरकर, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, या उद्देशाने सामाजिक बांधिलकी जपत कारगील योद्धा, २१ माजी सैनिक, नौदल अधिकारी आणि पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन साजरे करण्यात आला. याबरोबरच दरवर्षीप्रमाणे यंदाही 'पर्यावरण वाचवा' उपक्रमांतर्गत आळंदी आणि देहू येथे साडेतेराशे रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.


याबाबत बोलताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. संदेश मुखेडकर यांनी सांगितले, की स्टेप्स फाउंडेशन नियमित सामाजिक उपक्रम राबवित आले आहे. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेता झाडे लावणे ही काळाची गरज बनली आहे. आम्ही लावलेली झाडे जोपासण्याचीही तितकीच काळजी घेत असतो. लावलेली झाडे वाचली पाहिजेत, याकडे आमचे कटाक्षाने लक्ष असते.

# बर्गर किंग विरुद्धच्या कायदेशीर लढाईत पुणेकराचा विजय

पुणे । प्रतिनिधी

पुणेकर आपल्या बुद्धीचातुर्य, चिकटी आणि निष्ठेमुळे ओळखले जातात. जगभरात आपल्या या गुणांच्या जोरावर पुणेकरांनी आपल्या यशाची पताका रोवली आहे. व्यवसायात पुणेकरांची प्रगती चौफेर झाली आहे. पुण्यातील एका व्यावसायिकाने दिग्गज अमेरिकन कंपनी बर्गर किंगला धडा शिकवला. जगभरात १०० देशांमध्ये १३ हजार रेस्टॉरंट असणाऱ्या बर्गर किंगविरुद्धची कायदेशीर लढाई पुणेकराने जिंकली आहे. पुणे शहरात बर्गर किंग नावाच्या लोकप्रिय रेस्टॉरंटने बर्गर किंगविरुद्धची कायदेशीर लढाई जिंकली आहे.

अमेरिकन कंपनीने पुण्यातील




बर्गर किंग रेस्टॉरंटवर आपले नाव वापरल्याचा आरोप करत गुन्हा दाखल केला. भारतात बर्गर किंगच्या नावाने सुरू असलेली ही कायदेशीर लढाई १३ वर्षे चालली. आता निर्णय पुण्याच्या कंपनीच्या बाजूने आला आहे. अमेरिकन एमएनसी बर्गर किंगसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

न्यायायलयाचा निकाल असा

पुण्यातील कॅम्प परिसरात बर्गर किंग रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटविरुद्ध अमेरिकन फास्ट फूड कंपनी बर्गर किंग कॉर्पोरेशनने दाखल केलेली याचिका पुणे जिल्हा न्यायालयाने फेटाळली. न्यायाधीश सुनील वेद पाठक यांनी दिलेल्या आदेशात म्हटले की, अमेरिकन कंपनीने पुणे येथील कंपनीवर ट्रेडमार्क उल्लंघनासह अनेक आरोप केले होते. पुण्यातील कंपनीला त्यांचे नाव वापरण्यास बंदी घालावी, अशी मागणी कंपनीने न्यायालयाकडे केली होती. शिवाय त्यांना नुकसानभरपाईही देण्यात यावी. पुण्याचे बर्गर किंग रेस्टॉरंट अनाहिता आणि शापूर इराणी चालवतात. कॅम्प आणि कोरेगाव भागात त्यांची रेस्टॉरंट्स आहेत. त्यांचे नाव १९९२–९३ पासून आहे. अमेरिकन कंपनी खूप नंतर भारतात आली. दुसरीकडे पुण्याची कंपनी हे नाव बराच काळ वापरत होती. यामुळे अमेरिकन कंपनीची मागणी फेटाळली जात आहे.

# पुणे–दिल्ली विमानात वाकडच्या महिलेचा राडा; सीआयएसएफ कर्मचारी महिलेला घेतला कडकडून चावा

पुणे । प्रतिनिधी

पुणे–दिल्ली विमानात दोन प्रवाशांमध्ये वाद झाला. वाकड येथील एका महिलेने विमानातील दुसऱ्या प्रवाशासोबत भांडण केले. हे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या सीआयएसएफच्या कर्मचारी महिलेला देखील वाकड येथील महिलेने मारहाण केली. तसेच तिच्या हाताला कडकडून चावा घेत जखमी केले.

पुण्यातील विमानतळ पोलीस ठाण्यात सुरेखा सिंग (वय ४४, रा. वाकड) या महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सीआयएसएफच्या कर्मचारी




महिला प्रियांका रेड्डी यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याबाबत माहिती अशी की, सुरेखा सिंग ही महिला तिच्या पतीसोबत पुणे येथून दिल्लीला विमानाने जात होती. सुरेखा यांनी बुक केलेल्या सीटवर अवंतिका बोरसे आणि आदित्य बोरसे हे प्रवासी बसले होते. यावरून सुरेखा यांनी त्या दोन प्रवाशांसोबत वाद घातला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. विमानातील केबिन क्रुने टर्मिनल व्यवस्थापकांना ही बाब सांगितली. त्यानंतर प्रशासनाने सीआयएसएफच्या कर्मचारी प्रियंका रेड्डी यांना याबाबत माहिती दिली. प्रियांका रेड्डी आपल्या सहकाऱ्यांसोबत विमानात पोहोचल्या. त्यावेळी सुरेखा सिंग यांनी रेड्डी यांना मारहाण केली. तसेच रेड्डी यांच्या हाताला कडकडून चावा घेत त्यांना जखमी केले. रेड्डी यांनी या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणानंतर सुरेखा सिंग यांना विमानातून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर एक तास उशिराने विमानाने दिल्लीच्या दिशेने उड्डाण घेतले.

# पिंपरी मतदारसंघात दुबार ओळखपत्रांसह सात हजार नावे

पिंपरी । चिंचवड

लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीतसुध्दा मतदार यादीतील दुबार नावांचा घोळ कायम आहे. पिंपरी राखीव विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत तब्बल सात हजारांवर दुबार नावे असल्याचे पडताळणीत निदर्शनास आले आहे. अशा सर्व मतदारांना दुबार ओळखपत्र सुध्दा देण्यात आली आहेत. नियमानुसार कार्यवाही करून मतदार यादीतून दुबार नावे वगळण्यात यावीत, अशी मागणी स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे यांनी केली आहे. निवडणूक विभागाकडे त्यासंदर्भात पुराव्यांसह तपशिलवार यादी सादर केली आहे.

राज्यातील विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर पर्यंत असल्याने नोव्हेंबरच्या मध्यावर मतदान होईल, असा अंदाज आहे. निवडणूक विभागाने पिंपरी विधानसभा मतदारसंघाची



प्रारूप मतदार यादी तयार केली. ६ ऑगस्ट २०२४ रोजी ती प्रसिद्ध करण्यात आली. मतदारयादीवर हरकत आणि सुचनेसाठी १९ ऑगस्ट ही अखेरची मुदत आहे. दरम्यान, यादीच्या तपासणीत अत्यंत गंभीर अशा त्रुटी आढळल्याचे सावळे यांनी निदर्शनास आणून दिले.

याबबत लेखी पत्राद्वारे घेतलेल्या हरकती बद्दल माहिती देताना सावळे म्हणाला कि, दोन किंवा तीनदा किंवा चार वेळा नोंदणी असलेल्या मतदारांकडे वेगवेगळया क्रमांकांची स्वतंत्र ओळखपत्रेही आहेत. त्यामुळे निवडणुकीची संपूर्ण प्रक्रियाच संशयास्पद बनली आहे. तसेच अश्या प्रकारांमुळे लोकशाही धोक्यात येते. प्रारूप यादीमध्ये काही मतदारांची नावे त्याच यादीत दुबार नोंदविलेले आहे आणि अशा मतदारांना दुबार ओळखपत्र सुद्धा देण्यात आलेली आहेत. तर काही मतदारांची नावे लगतच्या भागातील इतर मतदार यादीत देखील नोंदविले असून त्याठिकाणी देखील मतदारांकडे दुबार ओळखपत्र देण्यात आलेली आहेत. तसेच काही मतदारांचे नाव मतदारसंघातील इतर भागात देखील नोंदविले असून आशा मतदारांना सुद्धा दुबार ओळखपत्र देण्यात आलेली आहेत. काही ठिकाणी पुरुष मतदाराचे नावदुबार नोंदविले गेले असून एका ठिकाणी पुरुषाचा तर दुसऱ्या ठिकाणी महिलेचा फोटो लावण्यात आला आहे.लोकप्रतिनिधी कायदा १९५० च्या तरतुदीनुसार दुबार मतदार नोंदणी व दुबार ओळखपत्र असलेल्या मतदारांची नावे आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया करून मतदार यादीतून दुबार ओळखपत्र असलेली नावे तातडीने वगळण्यात यावीत, अशी मागणी सीमा सावळेयांनी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# इंद्रायणीत बुडणाऱ्या महिलेचे स्वच्छता कर्मचाऱ्याने वाचविले प्राण

पुणे । प्रतिनिधी

इंद्रायणी घाटावर स्वच्छता करणार्या आळंदी नगरपरिषदेच्या कर्मचार्याने इंद्रायणी नदीत बुडणार्या महिलेचे प्राण वाचविले. शुक्रवारी (दि. १६) सकाळी ११ वाजता इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छतेचे काम करणार्या आळंदी नगरपरिषद कर्मचारी शक्ती लोकरे यांना नदीत एक महिला बुडत असल्याचे दिसले. लोकरे यांनी जिवाची पर्वा न करता इंद्रायणीत उडी मारत बुडत असलेल्या उषाबाई शेटे (रा. मोशी) या महिलेस बाहेर काढले. लोकरे यांनी तातडीने नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांना दूरध्वनीद्वारे या घटनेची माहिती दिली.

मुख्याधिकारी यांनी केलेल्या



सूचनेनुसार नगरपरिषद आपत्ती व्यवस्थापन विभागप्रमुख सचिन गायकवाड यांनी तत्काळ नगरपरिषद कर्मचारी व रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवली. पद्माकर शिरामे, शक्ती लोकरे या नगरपरिषद कर्मचार्यांनी तिथे उपस्थित काहींच्या मदतीने या बेशुद्ध महिलेस ग्रामीण रुग्णालय आळंदी येथे दाखल केले. वेळेवर रुग्णवाहिका बोलाविण्यात नगरपरिषद कर्मचारी प्रसाद बोराटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.